# CENTRAL HINDU MILITARY EDUCATION SOCIATY

ADDRESS :RAMBHOOMI, DR. MOONJE ROAD, NASHIK - 422005

# आविष्कार









Disign By - Swapnail Ahire

# राष्ट्रप्रहरी

| अ.क्र | व्याख्यान विषय | व्याख्याते |
|---|---|---|
| १ | समाज माध्यमांच्या मदतीने परिणाम कारक "वर्क फ्रॉम होम" | श्री. महेश कुलकर्णी, |
| २ | वेबकॉन्फरन्सिंग उपयोग | श्री अनिरुद्ध तेलंग |
| ३ | 'क्रीएटिव्ह टीचिंग' | सौ लीना चक्रवर्ती |
| ४ | शिक्षकाचे सामाजिक उत्तरदायित्व | श्री नितीन गर्गे |
| ५ | लिहिते व्हा ! | श्री. अभिजित मुळ्ये |
| ६ | योग व शिक्षण | डॉ.अजित भांद्दकर |
| ७ | ताण - तणावाचे व्यवस्थापन | सौ.शुभांगी वांगीकर |
| ८ | लावण्यारेखा- मुक्त चिंतन | श्री. दिलीप बेलगांवकर |
| ९ | अनुभव शिक्षणाचा | श्री.प्रशांत दिवेकर |
| १० | जीवनशैली | सौ.साक्षी भालेराव |
| ११ | समग्र शिक्षण. | डॉ. मधुश्री सावजी |
| १२ | योग दृष्टिकोन | सौ.रश्मी रानडे |
| १३ | सुंदर माझे घर | सौ.नीता पाटील |
| १४ | कोरोनाच्या प्रभावानंतरचे परिमाण | श्री. अतुल पाटणकर |
| १५ | वर्ग व्यवस्थापन | सौ. जयसुधा नायडू |
| १६ | राज्यघटना शिल्पकार डॉ.बाबासाहेब आंबेडकर आणि राज्यघटनेची वैशिष्ट्ये | डॉ.विष्णू पवार |
| १७ | औद्योगिक क्षेत्र 4.0 | डॉ. प्रीती कुलकर्णी |
| १८ | जगू या आनंदी | सौ.ज्योती रत्नपारखी |
| १९ | व्यवसायाभिमुख आणि अष्टपैलू शिक्षक | डॉ. अंजली सक्सेना |

| | | |
|---|---|---|
| २० | समरसता | श्री. संजय साळवे |
| २१ | कोरोनाच्या काळात घ्यावयाची काळजी | डॉ.गौरी कुलकर्णी |
| २२ | विद्यार्थी समुपदेशन | सौ.नेहा सोमण |
| २३ | परिस्थिती आणि मनःस्थिती | श्री.प्रकाशजी पाठक |
| २४ | प्रभावी शिक्षकांच्या सात सवयी | डॉ. प्रीती सोनार |
| २५ | मुलाखत | डॉ. दिलीप बेलगांवकर |
| २६ | भोसलाच्या आठवणी | डॉ.उन्मेष कुलकर्णी |
| २७ | बालमानसशास्त्र | सौ.शुभांगी बेलगांवकर |
| २८ | संघ आणि विविध क्षेत्रे | श्री. दिलीपराव क्षीरसागर |
| २९ | उत्तम वर्गव्यवस्थापन | डॉ.नेहा शिरोरे |
| ३० | SWOT विश्लेषण | सौ. वैजयंती पवार |
| ३१ | आर्य आक्रमणाचा सिद्धांत | श्री. वासुदेव बिडवे |
| ३२ | कोरोना महामारीमुळे निर्माण झालेली आव्हाने | श्री. हेमंत देशपांडे |
| ३३ | गप्पा | डॉ.विनायक गोविलकर |





**Foreword**

*Today we are in the midst of a pandemic and mankind has not hitherto encountered a global crisis of this magnitude. The lockdown implemented by the government has kept the citizens safe to a large extent, and helped to check the spread of the virus. But being indoors for an extended period has left many of them grappling with a different problem - mental health and behavioral issues – the most vulnerable ones being children and the elderly. Parents too are ill prepared to deal with this unforeseen turn of events where they have to be with their children 24/7 and keep them engaged. This is where, I believe, the teachers have a big role to play. Teachers are role models for their students and have a profound influence over their lives. It's really admirable that the teachers of all the units of the CHMES have taken the mantle and interacted with students and parents online. The current situation has brought in a sudden paradigm shift in the pedagogy being adopted by the teachers and we are moving fast towards the flipped classroom concept. In a very encouraging trend, all our teachers have conducted online classes with great zeal and delivered e-content in an effort to avoid academic loss.*

*In this crisis situation, it is very important for the teachers to maintain their mental health because only then will they be able to educate and guide the students in a stress free manner. The lockdown has been a blessing in disguise for all the members of CHMES as it has given an opportunity for value addition to their physical, social, economic, spiritual and mental health. The daily lecture series on varied themes of social, spiritual and national relevance organized by the CHME Society is not only a value addition to the teachers but also a great morale booster in the times of distress. This newsletter is a spontaneous expression of the situation of coronavirus through articles, poems, drawings, feedback and reports will have a greater reach. I extend my best wishes and support to all those involved in this noble endeavour. Let us all stand together in these challenging times and help our children to build a better future. Jai Hind*



*Shri. P.G.Kulkarni*

*Working President,*

*CHME Society, Nashik*

*Education has evolved over time by integrating evolving methodologies and technologies. In the Indian context, since ancient times, the Guru has been considered as indispensible part of the education system imparting holistic education to pupils. Today, where we have a plethora of information, the role of teacher has become more significant than ever. The role of a teacher has transformed into that of a facilitator where he or she not only teaches but also empowers the students to learn by themselves so that they become discerning enough to choose the right source and course. But for this, teachers need to equip themselves with new sets of skills to assist students under their tutelage. This lockdown has given ample time for the teachers to adapt to this new learning environment and I am glad that the teachers of CHMES have capitalized on this opportunity and conducted academic classes for the students through distance learning mode. The classes conducted through online platforms being interactive and participative, have sent a very positive message across to the students and parents who were concerned about the uncertainty prevailing today. As management of an organization, we too have the responsibility of empowering and motivating our teachers from time to time. We have been doing this in every academic year through the Dr. Moonje Lecture series and by organizing ...*

*seminars, workshops and teachers training programmes in the campus. The office bearers of the CHME society along with invited experts delivered a series of lectures on various topics during the lockdown period to keep the morale of the teachers high. These scheduled talks were not only aimed at adding value to their professional and personal lives but also instilling confidence in them. I take this opportunity to appreciate the I.T team for creating an effective network and streamlining the lectures and training sessions in a very meticulous manner. The forced vacation has presented an opportunity to all of us to rejuvenate ourselves and supplement our skills. This difficult phase too shall pass and we shall soon be contributing selflessly to rebuild the society with renewed vigour. I congratulate the entire team involved in creating this e-book of the lecture series with integrated audio content.*



# डॉ. दिलीप बेलगावकर

**सरकार्यवाह, सेंट्रल मिलिटरी एज्युकेशन नाशिक**

कोरोनामुळे निर्माण झालेल्या परिस्थितीला सामोरं जाण्यासाठी विद्यार्थ्यांना घरबसल्या ऑनलाईन शिक्षण देण्यासाठी ज्याप्रमाणे आधुनिक तंत्रज्ञानाची गरज भासली त्याच प्रमाणे या परिस्थितीचा सामना करण्या साठी भारतीय संस्कृती आणि संस्कार याची गरज ही काळाने अधोरेखित केली आहे.संस्कृतीकडे आवश्यक असणारा हा यू टर्न भविष्यात भारताला नव्हे तर सर्वच जगाला तारणारा ठरणार आहे. त्यामुळे सर्व जगच भारतीय संस्कृतीकडे मोठ्या आशेने पाहत आहे.

त्यामुळे भावी पिढी घडवणाऱ्या शिक्षक पालकांची जबाबदारी वाढली आहे .नवीन पिढीने आपल्या जीवनशैली बरोबरच आपला दृष्टिकोनही बदलण्याची गरज निर्माण झाली आहे. या दृष्टीने या लॉक डाऊनच्या काळात भोसलाच्या नाशिक विभागाने घरबसल्या विद्यार्थ्यांना ऑनलाईन दिलेले शिक्षण आणि शिक्षकांसाठी ऑनलाईन घेतलेला प्रशिक्षण वर्ग हे काम अतिशय कालसुसंगत आणि उचित असेच आहे .म्हणून स्तुत्य आहे.या इ- ज्ञान यज्ञात सहभागी झालेल्या सर्वांचे मनःपूर्वक अभिनंदन !!



# हेमंत देशपांडे

**कार्यवाह, सेंट्रल हिंदू मिलिटरी एज्युकेशन सोसायटी**

कोरोनाचे संकट अगदी अनपेक्षित पणे आपल्या सगळयांवर आले. सुरुवातीला तर प्रत्येक जण या संकटाने भांबावून गेला होता. नेमकं काय करावं ,कसं करावं? असे अनेक संभ्रम होते. सामान्य व्यक्तीपासून सर्वच क्षेत्रातील आणि स्तरातील व्यक्ती या संकटापुढे हतबल झाली होती .अशा परिस्थितीत भोसला कुटुंबातील सर्व सदस्यांना ऍक्टिव्ह मोडमध्ये ठेवणे फार मोठे आव्हान होते. शिशु गटापासून महाविद्यालया पर्यंत शिकणाऱ्या सर्व मुलांना आणि त्यांच्या शिक्षकांना एकमेकांच्या संपर्कात ठेवणे आवश्यक होते. एकूणच भोसला कुटुंबातील सर्व सदस्यांना सकारात्मक ठेवण्यासाठी ऑनलाइन संपर्क करण्याच्या उद्देशाने संस्थेने ठोस पाऊल उचलले.

संस्थेतील सर्व शिक्षकांना ऑनलाइन शिक्षणाचे रीतसर प्रशिक्षण देण्यात आले. यातून विस्कटलेली शिक्षणाची घडी पुन्हा एकदा बसण्यास मदत झाली. शिक्षक विद्यार्थी आंतरक्रिया घडून येऊ लागली. या परिस्थितीमध्ये शिक्षकांना उत्साही ठेवण्याचं मोठं काम होतं, यासाठी त्यांची सकारात्मकता वाढवण्याच्या दृष्टीने अनेक मान्यवर वक्त्यांची ऑनलाइन व्याख्याने सकाळच्या प्रसन्न वेळेत आयोजित केली गेली. त्यामुळे सकाळीच बुस्ट झालेले सर्व शिक्षक दिवसभर आपल्या विद्यार्थी आणि कुटुंबीयांसमवेत फ्रेश राहिले. स्वतः उत्साही झाल्यामुळे शिक्षकांनी स्वतःच्या कुटुंबात तर आनंदी वातावरण निर्माण केलेच पण त्याच बरोबर सातत्याने विद्यार्थ्यांशी, पालकांशी संवाद साधला. कोरोना विषयीची जागरूकता यामुळे निर्माण करणे शक्य झाले. अशा निस्तेज परिस्थितीत आरोग्य संवर्धनासाठी, मानसिक स्वास्थ्यासाठी योगासने, सूर्यनमस्कार, स्तोत्र पठण असे उपक्रम राबविण्यात आले. एकूणच भोसला कुटुंबाने एकजुटीने,एकसंघ होऊन या कोरोना विरूद्ध लढा सुरू ठेवला.

समाजात जिथे नकारात्मकता होती तिथे सकारात्मकतेचे रोप लावले. याचा फायदा निश्चितच विद्यार्थ्यांसोबतच शिक्षकांनाही झाला. याच सकारात्मकतेतून "इ न्यूज लेटर" आणि " इ बुक" या संकल्पना मनात आल्या आणि आज सत्यात उतरल्या आहेत. आमच्या भोसला कुटुंबियांनी एकत्र येऊन केलेले सामाजिक,शैक्षणिक स्तरावरील कार्य, आम्ही दिलेला लढा यात तुम्हास दिसून येईल. आमच्या विद्यार्थ्यांनी देखील यास त्यांच्या कवितांमधून, चित्रांमधून आकार दिला आहे. यानमित्ताने संस्थेतील विद्यार्थी, शिक्षक यांना अविष्काराचे एक व्यासपीठ उपलब्ध झाले. या सगळयांना मनःपूर्वक शुभेच्छा !!!




| | | |
|---|---|---|
| १ | लॉकडाऊन काळात भोसला बनले निराधारांचे आधार | तेजस पुराणिक |
| २ | सिग्नलवरची शाळा | माधुरी गडाख |
| ३ | करूया लॉकडाऊन व्हॉट्सअॅप विनोदाचे | वैशाली मुळे |
| ४ | आमचा लॉक डाऊन | मानसी बापट |
| ५ | छन्दाछन्दातून | वर्षा साळी |
| ६ | आता सर्वात्मके देवे | नीता पाटील |
| ७ | सूर्य नमस्कार. | प्रांजली आफळे |
| ८ | हम होंगे कामयाब | ज्योती रत्नपारखी |
| ९ | आमची अशीही मदत | संतोष जगताप |
| १० | एक नवी संधी | मानसी कुलकर्णी |
| ११ | कलेमुळे मिळाली सकारात्मक दृष्टी | सुनिता घोटकर |
| १३ | लॉक डाऊन मधील अध्यापन | स्वाती शिंदे |
| १४ | अंधारातील उजेड | स्वाती पवार |
| १५ | कोरोना आणि परिचरिका | बाळासाहेब घुले |
| १६ | असाही एक अनुभव | यामिनी पुराणिक |
| १७ | आयुर्वेदाची साथ | सोनाली अकोलकर |
| १८ | परीक्षा | प्रांजली आफळे |
| १९ | नाते जगवायचे | संकेत शिंदे |
| २० | कोरोनातील ऑनलाईन शिक्षण | रीमा गांगुर्डे |
| २१ | कोरोना एक संकट | अपूर्वा शेवाळे |
| २२ | प्रिय कोरोना | अनुष्का मोहोळे |
| २३ | मुलाखत | श्रावणी मोरे |
| २४ | बहुरंगी सुट्टी | सोहम कुलकर्णी |
| २५ | माझ्या शाळेचा मज लळा | शुभांगी वांगीकर |
| 26 | The great realisation of 2020 | मीनल काळोखे |




| | | |
|---|---|---|
| 1 | VPPCBSE Report | लीना चक्रवर्ती |
| 2 | Dr. Moonje Institute | डॉ.नितीन चौधरी |
| 3 | Bhonsala Institute of Information Technology | पंकज तुपसुंदर |
| 4 | Shishu Vihar English Medium | नेहा सोमण |
| 5 | शिशुवाटिका मराठी माध्यम | वैशाली भट |
| | | |
| | कविता विभाग | |
| १ | अब आगे कदम बढाना है | सोनाली अकोलकर |
| २ | कोरोना से दुषित होकर | डॉ.अंजली सक्सेना |
| ३ | कुदरत का खेल | हर्षल देवरे |
| ४ | कोरोनासोबत जगायला शिका | जया डगळे |
| ५ | देवा थांबव | मनीषा परदेशी |
| ६ | मनाची आस | वीणा मुठाळ |
| ७ | नको करोना | कृष्णा सोनावणे |
| ८ | करोना लवकर जाशील ना | प्रीती चव्हाण |
| ९ | कोरोना ,कोरोना,कोरोनां | संस्कृती शरमाळे |
| १० | गोदाकाठ | भारती शुक्ल |
| ११ | कोरोनाची किमया | मनीषा भालेराव |
| १२ | लॉक डाऊनची  युक्ती | राजेंद्र जोशी |
| १३ | कोविड १९ | अभिषेक  गवई |
| १४ | कोरोना | प्रीती डूबेरकर |
| | | |
| | प्रतिक्रिया | |
| | अविष्कार समिती | |
| | ऋणनिर्देश | |

# लॉक डाउन काळात भोसला बनले निराधारांचे आधार

सेवा है यज्ञकुन्ड समिधा सम हम जलें
ध्येय महासागर में सरित रूप हम मिलें।
लोक योगक्षेम ही राष्ट्र अभय गान है
सेवारत व्यक्ती व्यक्ती कार्य का ही प्राण है '!

या उक्तीला सार्थ करण्याचे कार्य लॉक डाउन च्या अतिमहत्वाच्या काळात सेंट्रल हिंदू मिलिटरी एज्युकेशन सोसायटीने पार पाडले. आधी केले मग सांगितले या तत्वानुसार संस्थेच्या भोसला मिलिटरी कॉलेजने समाजाप्रती आपले ऋण जाणले. त्यानुसार लॉक डाउन जाहीर होताच भोसला कॉलेज सामाजिक भान जपत स्थलांतरित मजुरांना समुपदेशन करण्यासाठी पुढे सरसावले. आपले उत्तरदायित्व ओळखून या मजुरांना भावनिक आधार देण्यासाठी टीम भोसलाने जिल्हा प्रशासनासोबत खारीचा वाटा उचलला.



कोरोना सारख्या विषाणूने साऱ्या जगात थैमान घातले आहे. तो दिवसेंदिवस अधिक गंभीर स्वरूपात डोके वर काढू पाहत आहे. देशाचे पंतप्रधान मा नरेंद्र मोदीजींनी भारतीयांना घरी राहण्याचा आणि सुरक्षित राहण्याचा सल्ला दिला. तो सर्वतोपरी सारेच भारतीय अंमलात आणण्याचा पुरेपूर प्रयत्न करतांना दिसतंय. हे सकारात्मक चित्र असले तरी आपल्या पोटाची खळगी भरण्यासाठी आपले गाव सोडून परराज्यातून आलेल्या मजुरांच्या अस्तित्वाचा प्रश्न निर्माण झाला. कारण काम - धंदे बंद झाले. पुढे काय या विवंचनेतून बाहेर काढण्यासाठी खंबीर हवे त्यांचे मन.

गरज लागली त्यांना प्रेमाचा ओलावा देण्याची. ती भरून काढली टीम भोसलाच्या सदस्यांनी. समुपदेशनातून त्यांनी इथेच थांबा , घाबरू नका आम्ही पण आपले कुटुंबीयच आहोत. टीम भोसला आणि भोसला परिवार तुमच्यासाठी सज्ज आहे. असा धीर देत त्यांची विवंचना आणि घराकडची ओढ काही प्रमाणात का होईना नियंत्रणात आणण्यात हातभार लावला. आता गरज आहे प्रत्येकाने स्वतःला आणि सोबत आपल्या कुटुंबियांना या आपत्ती काळात धीर देत मानसिक स्थैर्य कायम ठेवण्याची. त्याचाच एक भाग म्हणून सामाजिक भान जपण्याचा प्रामाणिक प्रयत्न संस्थेने आणि भोसला मिलिटरी कॉलेजने केला. या उपक्रमात धिटाईने सहभागी झालेल्या सर्व शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचे तोंड भरून कौतुक केले तेवढे थोडेच.

समुपदेशनासाठी महाविद्यालयाच्या मानसशास्त्र विभागाचा पुढाकार प्रशंसनीय ठरला. त्यासोबतच या टीम मध्ये एकूण २०० जण

जोडले गेले आहेत.  तर दुसरीकडे भयावह स्थिती म्हणजे रोजंदारीवर काम करणाऱ्या मोलमजुरी करणाऱ्यांची झाली. अशा स्थितीत त्यांच्यावर आणि कुटुंबियांवर उपासमारीची वेळ येऊ नये म्हणून भोसला महाविद्यालयाच्या नजीक असलेल्या संत कबीर नगर भागात राहणाऱ्या नागरिकांना संस्थेच्या माध्यमातून महाविद्यालयाच्या टीमने मोफत अन्नधान्य आणि किराणा वाटप केला. निराधारांना




मदतीचा आधार देत खऱ्या अर्थाने भोसला केवळ शैक्षणिक ज्ञान देणारे नसून सोबत  सामाजिक बांधिलकी जपणारे कृतिशील अग्रदूत ठरले असे म्हणणे वावगे ठरू नये.

सामाजिक जाणीवेसोबत विद्यार्थी केंद्रबिंदू मानून सुट्टीच्या काळात त्यांना पुढील वर्षाचे अभ्यासक्रम अवगत व्हावे याहेतूने ऑनलाईन अध्ययन अध्यापन प्रक्रिया  सुरु केली.एन डी ए च्या  निवासी विदयार्थ्यांना इयत्ता १२ वीचे वर्ग सुरु केले. सोबतच आर्टस्, कॉमर्स आणि सायन्स च्या विद्यार्थी विद्यार्थिनींचे इंग्लिश विषयाचे इयत्ता १२ वीचे लेक्चर सुरु केले आहे. त्याच्या माध्यमातून अनेक विद्यार्थी घर बसल्या  या सुविधेचा पुरेपूर उपयोग करून घेत असल्याने त्यांना १२वीचे शैक्षणिक वर्ष सोपे वाटू लागले आहे. वरिष्ठ महाविद्यालयाचे देखील ऑनलाईन वर्ग सुरु असल्याने आमचे काही शैक्षणिक नुकसान तर होणार नाही ना हा प्रश्न जो समोर उभा होता तो मिटला आहे. एकंदरीतच सेंट्रल हिंदू मिलिटरी एज्युकेशन सोसायटी आणि भोसला मिलिटरी कॉलेज यांच्या संयुक्त समन्वयाचा हा परिपाक म्हणावा लागेल. अखेरीस या  लेखाच्या माध्यमातून तमाम घर बसलेल्या बांधवांना आणि विद्यार्थ्यांना एकच आवाहन करतो की , घरी राहा , निरोगी रहा, सुरक्षित रहा ........ संस्थेच्या या  कार्याला हातभार लावणाऱ्यांना शुभेच्छा !

यापुढे देखील कोणत्याही आपत्तीप्रसंगी भोसला अग्रभागी होती , आहे ,आणि कायम राहणार असा विश्वास देत माझ्या भावनांना इथेच पूर्ण विराम देतो .. इतकेच म्हणावेसे वाटते या सांघिक पद्यातून ....

‘ दीन हीन सेवा ही परमेष्टी अर्चना
केवल उपदेश नही कर्मरूप साधना
मन वाचा कर्म से सदैव एक रूप हो
शिवसुन्दर नव समाज विश्ववन्द्य हम गढे ’ ! !

•

**तेजस पुराणिक, भोसला मिलिटरी कॉलेज**

# सिग्नल वरची शाळा..



महिला सायकलपटू असल्यामुळे नेहमीच अनेक प्रकारच्या रस्त्यावरून भटकंतीचा योग आला. या भटकंती दरम्यान वाहतुकीचे नियम पाळणारे आणि न पाळणारे असे सर्व प्रकारचे लोक भेटले.नियम पाळणाऱ्यांबद्दल नेहमीच कौतुक वाटायचे. मात्र न पाळणाऱ्या बद्दल काय उपाययोजना करता येईल याचा मनात विचार असायचा. शिक्षिका असल्या कारणाने सहवासात आलेल्या सर्वच विद्यार्थ्यांना हे नियम समजावून सांगण्याचा प्रयत्न केला. मात्र काही गोष्टी चार भिंतीत, वर्गात समजावून सांगणे अवघड होते .अगदी त्याच प्रमाणे हे नियम कितीही चिन्ह तक्ते वापरले  तरी वर्गात समाधान कारक रित्या शिकवता येत नव्हते आणि म्हणूनच काय करता येईल असा विचार सतत मनात घोळत रहायचा.लॉकडाऊनच्या निमित्ताने मला यावरचे उत्तर सापडले.या काळात आम्ही ऑनलाइन वर्ग सुरू केल्यामुळे हा प्रश्न सुटला. पोलीसमैत्रिण  म्हणून काम करत असताना सिग्नल वर वाहतुक नियंत्रणासाठी  मी मदत करायचे आणि त्याच वेळी तिथून मी माझा ऑनलाइन वर्ग चालवला .यामध्ये पहिली ते चौथी आणि पाचवी ते सातवी या वयोगटातल्या विद्यार्थ्यांना सिग्नल वाहतुकीचे नियम विविध, चिन्हांचा अर्थ
स्पष्ट केला. समजावून सांगताना सोबतीला वाहतूक पोलिस असल्याने मुलांनाही त्यांच्या प्रश्नांची, शंकांची उत्तरे मिळाली आणि मला समाधान! !!

**माधुरी गडाख, शिशु वाटिका इंग्रजी माध्यम**



# करूया लॉकडाउन व्हाट्सअप विनोदाचे

सध्या सर्वत्र विनोदाचे पेव फुटले आहे. बॉस भांडे घासतोय तर त्याचे कर्मचारी लादी पुसताय. मग काय यावर छान कार्टूनस नाहीतर चारोळ्या. बायका हा तर व्हाट्सॲपचा हुकमी एक्का. कोणीही यावे आणि टपली मारून जावे. आणि आम्ही हसायला मोकळे. आरोग्यासाठी हसणे चांगलेच पण प्रत्येक गोष्टीला सीमा असतात. आपले माननीय पंतप्रधान कोरोनाशी कसे लढायचे या विचारात तर आपण हे विनोद किती ठिकाणी पाठवू शकतो या विचारात. मनात विचार आला की सर्वत्र असेच असेल का ? का काही वेगळे चित्र असेल? मी काही इतर देशांमध्ये कोणते विनोद चालतात हे पाहिले नाही.पण काही घडामोडी पाहता आणि अमेरिका, जर्मनी आणि भारत ह्या तिन्ही देशातील लॉक डाऊनची  जर तुलना करायची झाली तर ह्या काही गोष्टी मी लिहू शकते.

अमेरिकेत अनेक लोकांना लॉक डाऊन मान्य नाहीये. ते नाही पाळले तर त्यातून उदभवणाऱ्या धोक्याची त्यांना जाणीव आहे पण सरकारने लोकांच्या स्वातंत्र्यावर बंधने न आणता परिस्थिती काबूत आणावी अशी त्यांची मागणी आहे. लवकरात लवकर लॉक डाऊन संपून नोकरी व्यवसाय परत चालू व्हावेत अशी मुख्य मागणी मोर्च्यांतून, मुलाखतींतून वगैरे असते. दुसरे म्हणजे, चीनने आपली अर्थव्यवस्था नष्ट करायला हा विषाणू तयार केला असावा अशी एक शंका इथे आहे. त्यामुळे ह्या प्रकाराकडे एक आक्रमण किंवा युद्ध म्हणून बघावे आणि तसे असेल तर आपली अर्थव्यवस्था कदापिही ढासळू द्यायची नाही, मग त्यासाठी कितीही मनुष्य हानी झाली तरी चालेल असा एक मतप्रवाह आहे. युद्धात मनुष्य हानी होतेच, ती सहन करायची आणि अर्थव्यवस्था शाबूत ठेऊन शेवटी हे युद्ध जिंकायचे असे अनेकांच्या बोलण्यातून येते.

जर्मनीतूनसुद्धा बऱ्यापैकी  अशा स्वरूपाचे मेसेजेस येतात. अर्थव्यवस्था किकस्टार्ट कशी करायची. लोकांपर्यंत स्टिम्युलस कसा पोचवायचा. भविष्यात अशाच स्वरूपाच्या घातक साथी येतील तर त्याला तोंड द्यायला काय प्रकारची उत्पादने, सर्व्हिसेस निर्माण करायच्या.. वगैरे

आपल्याला लॉकडाऊन मध्ये राहायचे आहे आणि युध्द पण जिंकायचे आहे.त्यासाठी तर आपले सरकार प्रयत्नशील आहे. ज्याच्याकडे जे चांगले ते टिपून घेता आले पाहिजे.कोणासारखे नाही वागायचे, कोणी म्हणते म्हणून  बदल नकोय.तर स्वतःच्या उर्मीतून बदल झाला पाहिजे.

अनेक कम्पन्यांनी एव्हाना ऑफिस स्ट्रक्चर बदलले आहे. एम्प्लॉयी बसायच्या जागा प्लेक्सिग्लास लावून प्रत्येक माणसाला प्रायव्हेट जागा कशी करून देता येईल याचा विचार केला आहे.विमान कम्पन्यांनी बसायच्या पद्धतीत बदल करून विमान प्रवास जास्तीत जास्त सुरक्षित कसा करता येईल इकडे लक्ष दिले आहे. सुपर स्टोअर्स नी ग्राहकांना सेफ कसे ठेवता येईल ह्याकडे लक्ष केंद्रित केले आहे. हातावर सॅनिटायसरचा फवारा, बिलिंग काऊंटर वर आयसोलेशन, ग्राहकांना चालण्यासाठी चक्राकार पद्धत, अत्यंत एफिशिएंट ऑन लाईन डिलिव्हरी अश्या अनेक गोष्टी इथल्या समाजाने गेल्या ३०-४० दिवसात केल्या आहेत.



एकूण देश आणि अर्थव्यवस्था कशी टिकवायची फक्त ह्याचीच चर्चा इथे दिसते. विशेषकरून 'पुरुषांना घरात राहावे लागल्यामुळे' ह्या मुख्य सूत्रावर आधारित फालतू विनोद... ह्याचा पूर्ण अभाव.

भारतातून काय वाचायला मिळते?

दारूची वानवा, पुरुषांनी भांडी घासणे, बायको आणि तिच्या आईचे फोन, पुरुषांना घरी स्वयंपाक करायला लागणे, ढुंगणावर पोलिसांनी मारलेले फटके, तबलीघी, मोदी, राहुल इत्यादी विषयावर विनोद. किंवा कुणाच्यातरी दुःखाचे केलेले राजकारण, उदा. मजुरांची पायपीट. ८०० किमी चालून जाणाऱ्या कुटुंबाला वाटेत १ कुटुंब किंवा १ गाव असे मिळू नये जे त्यांना अन्न वस्त्र निवारा देऊ शकले असते आणि त्यांची पायपीट थांबवू शकले असते? कुटुंब ८०० किमी चालून गेलं ह्याची बातमी पण त्यांना कोणी आसरा दिला नाही.... ही बातमी नाही?

एक राष्ट्र एक समाज म्हणून एकत्र कसे लढायचे ह्यावर एक पोस्ट किंवा मेसेज नाही. कोरोना गेल्यावर जिद्दीने कसे उभे राहायचे, नुकसान (देशाचे राहूद्या .. किमान स्वतःचे) कसे भरून काढायचे ह्यावर एक पोस्ट नाही. परत कोरोना सारखी साथ आली तर कशी आणि काय तयारी ठेवायची ह्यावर भाष्य नाही.

दुप्पट किमतीत भाज्या आणि धान्य का घ्यावे लागतेय ह्याच्यावर कोणी बोलणार नाही पण दारू नाही मिळाली तर सरकारचा महसूल कसा बुडतो वगैरे वर Phd. पासपोर्ट विरुद्ध राशन कार्ड पोस्ट्स. लागोपाठ इरफान गेला, ऋषी गेला म्हणून आश्चर्य वगैरे व्यक्त करणाऱ्या पोस्ट्स. कुणाच्या शेवटच्या घटकांचा व्हिडीओ, इरफानला जाळले की पुरले, ऋषीची इस्टेट किती वगैरे पोस्ट्स. वास्तविक दोघेही कॅन्सरने गेले पण कॅन्सरशी लढा कसा द्यायचा ह्यावर आली का एखादी पोस्ट? आणि आता दारूसाठी लागलेल्या रांगा ह्यावर पुढे २-३ दिवस सहज पोस्ट चालेलं.

चला एक पाऊल विकासाकडे टाकू या.काहीतरी विधायक करू या. आपल्या संस्थेने ज्या सृजनात्मक दिशेने आपल्याला नेण्याचे ठरविले आहे त्यावर मार्गक्रमण करू यात.

**सौ. वैशाली विशाल मुळे,**

**विद्या प्रबोधिनी प्रशाला मराठी**



# ‘माणुसकीच्या झरोक्यातून’

कोरोंनाच्या संसर्गाचे आज संपूर्ण मानवजातीवर अनिष्ठ असे संकट उभे राहिले आहे. प्रत्येकजण आपापल्या परीने उद्भवलेल्या परिस्थितीचा सामना करण्याचा प्रयत्न करीत आहे. अवघ्या विश्वात यावर मात करण्याकरिता उपाययोजना शोधल्या जात आहे. परंतु सर्वकाही निष्फळ ठरत आहे..बलाढ्य देशांनी कोरोंना समोर गुडघे टेकले,परंतु संपूर्ण भारत देश जिद्दीने याला हरवण्याचा प्रयत्न करीत आहे.यश मिळेलच असा सकारात्मक दृष्टिकोन ठेऊन आपल्या देशाची वाटचाल होतांना दिसत आहे.

एक उत्तम उदाहरण जगापुढे प्रस्थापित केले जात आहे. आणि याचे श्रेय आपण आपले माननीय पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना दिले पाहिजे.जगभरात एक चांगले उदाहरण म्हणून आपल्या देशाकडे बघितले जात आहे. नेहमीच आपला देश मार्गदर्शक ठरला आहे यात काही शंकाच नाही.या अशा परिस्थितीत लॉकडाऊनचा निर्णय उत्तम ठरला आहे. जनताही तेवढ्याच कसोशीने तो पाळत आहे.जेव्हा जेव्हा असे काही संकट देशासमोर उभे राहिले आहे त्या त्या वेळी देशातील प्रत्येक नागरिक सजगतेने पुढे आला आहे.

मानवजातीकडून निसर्गावर होत असलेले अतिक्रमण जीवघेणे ठरत होते.या विश्वकर्मानिर्मित सृष्टीचे आपण एक घटक आहोत हेच तो विसरला होता. आपली माणुसकी तो पायदळी तुडवत संपूर्ण निसर्गावर मात करण्यास तो निघाला होता.परंतु या गोष्टीचा त्याला जणूकाही विसर पडला होता.आज घडीला त्याचा भ्रमाचा भोपळा फुटला आणि आटलेला मायेचा पाझर पुन्हा नव्याने वाहू लागला.निसर्ग मोकळा श्वास घेतांना दिसत आहे,बहरत आहे. खुजी ठरली ती मानवजात!!! माणूस आणि माणुसकीची व्याख्या खऱ्या अर्थाने सुस्पष्ट होतांना दिसते.भुकेल्यास अन्न,तहानलेल्यास पाणी देणे ही आपली संस्कृती आहे.आपण तो ठेवा जपत कित्येक गरजूनां मदत पुरवली पाहिजे. मदतीचा हात अनेक धनिकांनी पुढे केला आहे.गरीब कुटुंबे उद्ध्वस्त होण्याच्या मार्गावर होती,त्यांना सामाजिक बांधिलकीच्या नात्याने मदत करून सावरले जात आहे.अनेक संस्था,ट्रस्ट पुढे सरसावले आहे. मला वाटते माणुसकी हाच आपल्या देशाचा मूळ गाभा आहे.

संपूर्ण देशात अग्रगण्य असलेले भोंसला मिलिटरी स्कूल हे नाव नेहमीच बहूचर्चित राहिलेले आहे. संस्थेचे संस्थापक धर्मवीर डॉ. बाळकृष्ण शिवराम मुंजे यांनी ८२ वर्षांपूर्वी राष्ट्रहित समोर ठेऊन संस्थेची निर्मिती केली. ‘देशसेवा हीच ईश्वरसेवा’ हा वसा त्यांनी दिला. त्यांनी दिलेल्या बाळकडूवर आज शाळा कार्यरत आहे.‘शाळा आजही देशसेवा हीच ईश्वर सेवा’ हा वसा हाती घेऊन



आजातागायत भरीव कामगिरी करत आहे. भोंसला मिलिटरी स्कूलने नेहमीच सामाजिक बांधिलकी जपली आहे.ती शैक्षणिक असो वा सामाजिक असो नेहमीच तत्परतेने उभी राहिली आहे. पूरपरिस्थिती,आपत्कालीन परिस्थिती, वृक्षसंवर्धन,जलसंधारण,सैनिकी सेवा अशा अनेक समस्यामध्ये खंबीर योगदान दिले आहे. आज घडीला जी लॉकडाऊन मुळे समस्या उद्भवली आहे त्यात शाळा मागे कशी राहील.सांगायचेच झाले तर....

**'पोटापुरता पसा पाहिजे नको पिकाया पोळी**
**देणाऱ्याचे हात हजारो फाटकी माझी झोळी'.** या कवितेच्या ओळी समर्पक ठरतात. शाळा आज हजारो हातांनी मदतीस सक्षमपणे उभी राहिली आहे. शिक्षक,पालक,विद्यार्थी,शिक्षकेतर कर्मचारी आपापल्या परीने मदत करीत आहे.शाळेचे प्राचार्य एम. एन लोहकरे सर यांनी बऱ्याच गरजू व्यक्तीना मदत केली. विजय पाटील हा रिक्षाचालक आहे.त्याच्या घरची अवस्था बिकट होती.या लॉकडाऊन परिस्थितीत त्याच्या वर उपासमारीची वेळ आली.ही बाब सरांना समजली असता,सरांनी स्वतः त्याची विचारपूस करून, त्याला महिनाभर पुरेल एवढा किराणा भरून दिला. तसेच सहा मजूर कुटुंबाला राशन भरून दिले.शाळेतील पुराणिक सर,खवळे सरांनी ट्रक टर्मिनल वर अडकलेले ट्रकचालक व त्यांचे सहकारी यांना घरून डबे पुरवले.मनमोहन मराळकर यांनी आपल्या परिसरात आपल्या सहकारी मित्रांच्या मदतीने भद्रकाली परिसरात जनजागृती करत,घरी रहा सुरक्षित रहा. हा संदेश पोहचवला. तर पुण्यावरून आलेल्या महिलेस प्राप्त परिस्थितीचे गांभीर्य लक्षात आणून देत क्वारंटाईन होण्यास सांगितले. जगताप सर यांनी महाराष्ट्र नेवल यूनिट एन. सी. सी. मुंबई तर्फे सर्व एन. सी. सी. ऑफिसर यांचे कोविड -१९ एन. सी. सी. क्याडेट्स हे ऑनलाईन प्रशिक्षण घेऊन स्वतः शाळेतील विद्यार्थ्यांना ऑनलाईन ट्रेनिंग दिले.तसेच कोविड -१९ वर विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

ग्रामीण भागातील शेतमजूरांची परिस्थितीही बिकट आहे. काम बंद असल्याने त्यांच्या वर उपासमारीची वेळ आलेली आहे.सध्या मी माझ्या हट्टी या मुळगावी वास्तव्यास आहे.गावाकडे आमचा मुळ व्यवसाय शेती आहे.यावेळी शेतातील बरीच कामे यांत्रिक पद्धतीने पूर्ण केली गेली असल्याने मजूर लागणार नव्हते त्यातल्या त्यात एक एकर क्षेत्रात गहू होता व गहू कापणीस हारवेस्टर लावायचे होते.परंतु वडिलांशी चर्चा करून आम्ही हारवेस्टर न लावता आम्ही ते चार गरजू शेतमंजूरांना कापणीस दिले.व त्यातील एक पोते गहू त्या शेतमंजूरांना वाटप केले.तसेच त्यांच्या कामाचा योग्य मोबदला ही दिला.जे केले ते मोठेपणा मिळावा म्हणून नाही, तर आपल्या ओंजळीत जेवढे बसेल तेवढे आपल्या जवळ ठेवावे, ओंजळीतून निसटून मातीमोल होण्याच्या पहिले,ते वाटून टाकावे ही आपली संस्कृती आहे.आपण समाजाचे एक घटक आहोत.या जीवनात जसे मातृऋण,पितृऋण,आहे आणि ते आपल्याला चुकते करावे लागते त्याच प्रमाणे समाजऋण सुद्धा आहे आपण ते ध्यानी ठेवत चुकते करण्याची ही योग्य वेळ आहे. ही भावना मनात ठेऊन आज समाजकार्यात उचलेला हा छोटासा खारीचा वाटा !



या मातीत जन्माला आलो आहोत या मातीतच विलीन होणार आहोत.चला तर मग अहंकारच्या बेड्या तोडून माणुसकीचा मळा पिकवू या !!

**जे का रंजले गांजले|**
**त्यासि म्हणे जो आपुलें**
**तो चि साधू ओळखावा|**
**देव तेथें चि जाणावा ||**

**अमोल शामसिंग परदेशी, भोंसला मिलिटरी स्कूल**



# आमचा लॉकडाऊन

मध्यवर्ती हिंदू सैनिकी शिक्षण मंडळ  शिक्षण क्षेत्रातली अग्रगण्य अशी संस्था म्हणून प्रसिद्ध आहे. लॉक डाऊन च्या काळात विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान भरून काढण्यासाठी ऑनलाइन शिक्षणाचा नाविन्यपूर्ण अभिनव निर्णय संस्थेने घेतला आणि त्याची यशस्वी अंमलबजावणीही झाली. याच संस्थेचा एक घटक असल्याकारणाने प्राथमिक स्तरावर मलाही ऑनलाइन शिक्षण राबवायचे  होते.विद्यार्थ्यांचा वयोगट लक्षात घेता अनेक शंका, प्रश्न मनात सुरुवातीला होते. मात्र प्रशिक्षण झाल्यानंतर पालकांच्या मदतीने विद्यार्थी या ऑनलाइन शिक्षण प्रवाहात अगदी आनंदाने सहभागी झाले .

सुरुवातीला विद्यार्थी हे हाताळू शकतील की नाही असा संभ्रम होता, मात्र विद्यार्थ्यांनी सराईतपणे ऑनलाइन शिक्षण घेतले शिक्षकांनीही ही विविध प्रयोग या शिक्षण पद्धतीत केले आणि मुलं पालक या लॉकडाऊन च्या काळात शिक्षणाशी जोडून ठेवले त्यामुळे हा ही काळ  आमच्या विद्यार्थ्यांच्या आयुष्यातला एक आनंददायी काळ ठरला असे आम्ही म्हणू शकतो. जेव्हा या ऑनलाईन वर्गाला सुट्टी असायची तेव्हा पालक मुलं हे दुसऱ्या दिवशीच्या तासाची वाट पाहायचे. पालकांच्या अनेक सकारात्मक प्रतिक्रिया याबाबत आम्हाला मिळाल्यामुळे संस्थेचा हा निर्णय यशस्वी झाल्याची पावती आम्हाला मिळाली. या ऑनलाईन शिक्षणामुळे आमच्या विद्यार्थ्यांमध्ये कोरोना विषयी जनजागृती सकारात्मकता निर्माण करता आली याचा आनंद आणि समाधान निश्चितच आहे.

**सौ मानसी बापट, मुख्याध्यापिका, शिशुविहार व बालक मंदिर, मराठी माध्यम(१ली ते ४थी)**



# छंदा छंदातून

**पंख बावरे लकलक करती उडता उडता दिशा हरवती**
**एका जागी क्षणभर ठरती लगेच उडती पुन्हा..**
**तयांचा छंद असे हा जुना.**
**फिरत रहाणे त्यांचे जीवन मधुसंचय हे त्याचे कारण…**

लहानपणी आपण आपल्या स्वप्नाचं रॅकेट इतक्या उंचावर उडवतो की मोठे होऊन ते आकाशाच्या एका छोट्याश्या कक्षेत जाऊन स्थित होते.

लहानपणा पासून आपण आपले स्वप्न रंगवत असतो. आणि प्रत्येकाला कोणता न कोणता छंद आणि कला नक्की अवगत असते, आपल्या छंदातून आपल्याला नक्कीच समाधान व आनंद मिळत असतो आणि आपण तो वेचत जातो. प्रत्येकाला आपली समाजात एक वेगळी ओळख निर्माण करावयाची असते आणि आपण त्या दृष्टीकोनातून प्रयत्न करीत असतो.याचप्रमाणे मला ही चित्रकला आणि कागदाच्या विविध नवनवीन वस्तू बनवण्यास आवडते. पण आपल्या दैनंदिन धावपळीच्या जीवनात आपला छंद जोपासणे कुठे तरी कमी होऊ लागते आणि त्याकडे थोडे दुर्लक्ष होत जाते, पण ह्या कोरोनाच्या पार्श्वभूमीवर आपल्याला हा अनमोल वेळ मिळाला आहे ह्याचा आपण नाक्कीच फायदा घेतला पाहिजे… ह्या दृष्टीकोनातून मी माझ्या छंद जोपासण्यास सुरुवात केली. आपल्याला एखाद्या गोष्टीची माहिती हवी असल्यालास आपण लगेचंच गुगल वर शोधतो , हा विचार करता मी माझा छंद जोपासण्यास सुरुवात केली **स्विफ्ट क्राफ्ट** या नावाने माझे यूट्यूब चॅनल सुरु केले आणि माझा आनंद वेचत गेले. त्याला भरपूर लाईकही आल्या.

ही एक भविष्याच्या दृष्टीकोनातून गुंतवणूक देखील आहे. आणि एक स्वतःची नवीन ओळख निर्माण करण्याचा प्रयत्न केला.

**साहित्यसगीतकालाविहीनः**
**साक्षात्पशुः पुच्छविषाणहीनः |**

**वर्षा साळी, शिशुविहार बालक मंदिर १ली ते ४थी मराठी मध्यम.**



# आता सर्वात्मके देवे

आता सर्वात्मके देवे
विनाकारण न फिरावे
घरीच बैसोनी द्यावे
एकांतदान हे |

या ओळींचा प्रत्यय कोरोनाच्या विषाणूमुळे घरी राहण्याची वेळ आली तेव्हा आला.

मार्च महिन्यात चीनमध्ये कोरोना विषाणूचा प्रादूर्भाव अशा बातम्या यायला लागल्या. पण नेहमीप्रमाणे बातम्या बघितल्या जात होत्या . हळूहळू आजारी लोकांची संख्या वाढायला लागली. वेगवेगळे व्हिडीओ बघायला मिळायला लागले.त्यात प्राण्यांचे, पक्ष्यांचे पण होते. नेमके काय कशामुळे होतंय तेच कळेना. भारतात फक्त बातम्या येत होत्या.

अचानक कोरोना रुग्ण अनेक देशात आढळायला लागले. त्यांचे आकडे वाढत होते. दुसऱ्या देशातून येणाऱ्यांची तपासणी केली जात होती. यावेळी भारतातही रुग्ण आढळले. आजाराच्या लक्षणावरून सुरुवातीला त्याचे गांभीर्य लक्षात आले नाही.

त्याचवेळी लॉकडाऊन शब्द पहिल्यांदा ऐकला. एकाचवेळी पूर्ण भारत बंद याची कधी कल्पनाही केली नव्हती. असं शक्य होईल असं स्वप्नातही वाटलं नव्हतं. सर्व भारत बंद झाल्यावर खऱ्या अर्थाने लॉकडाऊनचा अर्थ कळला. क्वारंटाइनचा अर्थ कळला.

आजारी माणसं, वृद्ध माणसं घरात कसे रहात असतील त्यांच्या वेदना कशा असतील याचा प्रत्यय आला.

प्रश्न होता घरात वेळ कसा जाईल? पण ठरवले. आपल्याला शाळेच्या कामात पुस्तक खूप कमी वाचली जातात. त्यामुळे पुस्तके वाचन करण्यासाठी काढली व जे छंद आहेत ते पूर्ण करायचे. पण तो विचार थोडा बाजूला राहिला कारण झूम एप्लीकेशन चा विषय पुढे आला.

पहिल्या दिवशी मनात येत होते आपण करू शकू का? आपल्याला येईल का?पण जसे मार्गदर्शन मिळत गेले व त्याचा उपयोग करता आला. तेव्हा खूप आनंद झाला. आपण करू शकतो ही भावना आत्मविश्वास वाढवून गेली.

ज्या दिवशी शिकलो त्या दिवसापासून त्याच्यात वेळ जायला लागला. आलेल्या अडचणी दूर करणे व सुरळीत झूम वापरण्यासाठी सतत आठ दिवस पूर्ण दिवस मोबाईल हातात होता. आयुष्यात इतका मोबाईल कधीच वापरला नव्हता पण आलेल्या अडचणी सोडवणे यातही एक मजा असते. आणि ती अडचण सोडवल्याचा आनंदही खूप मिळतो. शिक्षकांचे प्रशिक्षण व त्याद्वारे मुलांशी संवाद साधावा हा विषय पुढे आला. आणि रोज मुलांसाठी वेगवेगळ्या विषयांची प्राथमिक उजळणी सुरु झाली. सकाळच्या सत्रात विविधांगी विषयांवर विचारमंथन होत आहे. वर्षभरातही एवढे विषय पुढे आले नसते.असे शिक्षक व्यक्तिमत्व फुलावण्यासाठीचे



वेगवेगळया ढंगाने विचार ऐकायला मिळाले. विद्यार्थ्यांनाही झूम अॅप वर शिकण्यात मजा येऊ लागली. यामुळे विद्यार्थ्यांना शाळेशी, शिक्षकांशी बांधून ठेवता आले. संवाद साधता आला. वेगवेगळया कलांना उत्तेजन देण्याचा प्रयत्न झाला. काही मुलांनी कोरोनावर व्हिडिओद्वारे मत व्यक्त केले, काहींनी गाण्याचा सराव केला, काहींनी चित्र काढले, तर काहींनी कोरोनाची वेगळया पद्धतीने जागृती केली. काही शिक्षिकांनी विद्यार्थ्यांना रेसिपी शिकवल्या. मनस्वी जगझाप हिने कोरोनाची जागृती केली (व्हिडिओ द्वारे) तर ७ वी च्या विद्यार्थ्यांनी स्टे होम चा संदेश दिला. साक्षी मोरे व दिशा पाटील यांनी छान चित्र काढून आपली कला जोपासली. अक्षय कुलकर्णी याने प्रयोग केले. मनात विचार आला पूर्ण महिना कसा गेला? कळलंच नाही. संस्थेने झूमद्वारे व्याख्यानं, शिक्षक-विद्यार्थी संवाद, अध्ययन-अध्यापन या गोष्टी मांडल्या व त्या यशस्वी झाल्या. नकारात्मकतेडून सकारात्मक दृष्टीकोन संस्थेने दिला. विद्यार्थी, शिक्षक, पालक एवढेच नाही तर शिक्षकेतर कर्मचारी यांना एका कुटुंबात बांधण्याचे स्वप्न पूर्ण केले.

फक्त अभ्यास एक अभ्यास असे न बघता सृजनशीलतेला वाव मिळण्यासाठी प्रयत्न करण्यास प्रोत्साहन दिले. त्यामुळे शिक्षकांनाही उत्साह वाटला आणि वक्तृत्व, चित्र, गायन, पाकशास्त्र, वैज्ञानिक प्रयोग या विविधांगाने सृजनशीलतेला वाव देण्याचा त्यांनी प्रयत्न केला.

लॉकडाऊन सुरु झाल्यावर आता काय करणार हा प्रश्नच उरला नाही. आपण घरी बसून सर्व कामे करू शकू याचा विचारही मनात नसतांना एक एक कल्पना पुढे येऊन पुन: करण्याचा प्रयत्न झाला. दररोज सायंकाळी श्लोक, स्तोत्र, म्हणण्याची सवय लागली. प्रयत्ने वाळूचे कण रगडता तेलही गळे म्हणतात ना ते हेच.

देश लॉकडाऊन झाला तरी कुटुंब, संवाद, नाती, प्रार्थना, व्यायाम, छंद, वाचन, श्रवण, कल्पनाशक्ती, सर्जनशीलता लॉकडाऊन झाली नाहीत . आलेल्या संधीच सोन करा. वेळेचा सदुपयोग करा. यातूनच सकारात्मकता घेऊन संकटावर मात करू. यश नक्की मिळेल.

**नीता पाटील, मुख्याध्यापिका,**

**•शिशु विहार व बालक मंदिर ५ वी ते ७ वी**

# सूर्यनमस्कारआणि योग-काळाची गरज-



लॉक डाऊन च्या काळात आरोग्य निरामय राहण्यासाठी पालकांना, विद्यार्थ्यांना सूर्यनमस्कार करण्याचे आवाहन केले गेले. आणि खूप चांगला प्रतिसाद मिळाला.

भारतीय संस्कृतीतील योग संपूर्ण जगात मान्य केला गेला आहे. निरामय आरोग्यासाठी या योगाबरोबरच सूर्यनमस्कार देखील महत्त्वाचे आहेत . तेजोमय सूर्याच्या बारा नावांचे स्मरण करून,त्याला वंदन करून अष्टांगाचा व्यायाम साधणारे सूर्यनमस्कार. नियमितपणे हे सूर्यनमस्कार घातल्यास शरीर लवचिक ,अचपळ बनते. स्नायू,हाडे मजबूत होतात. अन्नपचन योग्य प्रकारे होऊन रक्ताभिसरण योग्य पद्धतीने होते आणि या सर्वांमुळे एक प्रकारची उर्जा, उत्साह,प्रफुल्लितपणा निर्माण होतो .माणसाचा शत्रू असलेला आळस दूर पळून जातो.

असे शरीराला सुदृढ करणारे सूर्यनमस्कार करण्याचे आवाहन केले गेले. आणि खरोखरच मुलांनी सुट्टीच्या या काळात सूर्यनमस्कार घालायला सुरुवात केली . ही सवय मुलांना या वयात लागली तर ती आयुष्यभर पुरेल आणि एक निरामय मजबूत शरीर आयुष्यभर त्यांना साथ देईल.

**प्रांजली आफळे, विद्याप्रबोधिनी प्रशाला ,इंग्रजी माध्यम**



# हम होंगे कामयाब

कोरोनाचं संकट आलं आणि सामाजिक, आर्थिक, शैक्षणिक, सांस्कृतिक, धार्मिक अशा सर्वच स्तरांवर प्रचंड उलथापालथ झाली नंतर हळूहळू सर्वकाही घरात स्थिरावलं गेलं. आमच्या शाळेच्या बाबतीतही असंच काही झालं मुलांना अचानकपणे सुट्टी जाहीर केली गेली. खरं तर हा काळ अभ्यास पूर्ण करण्याचा, सराव घेण्याचा आणि परीक्षांचा होता. मात्र कोरोनाने सगळयांना स्टॅच्यू केलं. अशावेळी मुलांचं शैक्षणिक नुकसान टाळण्यासाठी संस्थेने लगेचच पाऊले टाकलीत. ऑनलाईन शिक्षण सुरू करण्याचा पर्याय सर्व शिक्षकांसमोर ठेवला. शिक्षकांनीही हसत हसत हा मार्ग मनापासून स्वीकारला.

आमचं पुन्हा एकदा शिक्षण सुरू झालं. सुरुवातीला शिक्षकांना, पालकांना आणि मुलांनाही बऱ्याच अडचणी आल्या पण "अडचणींवर मात करतो तोच खरा माणूस" हे वाक्य सर्वार्थाने खरं करत आम्ही सगळयांनी यात प्राविण्य मिळवलं. शिक्षक वेगवेगळया उपक्रमांद्वारे शिकू आणि शिकवू लागले. शिक्षकाच्या मार्गदर्शनाने पालक सुद्धा मुलांना मदत करू लागले आणि मुलं मनापासून सारं समजावून घेऊ लागलीत. खरं तर शिक्षकांना ऑनलाईन शिक्षणामुळे विद्यार्थ्यांच्या अधिकाधिक जवळ जाणं शक्य झालं, त्यांच्या अडचणी समजून घेतल्या घेता आल्या.

माझ्या वर्गासाठी मी रोज काहीतरी नवीन करण्याचा प्रयत्न केला. यातून मला माझी मुलं अधिक समजली. अवघड परिस्थितीत ब-याच मोठ्या कालावधीनंतर पालकांशी आणि विद्यार्थ्यांशी संवाद साधता आला. ऑनलाईन शिक्षणासाठी त्यांचा सकारात्मक प्रतिसाद मिळाला. दुसऱ्या दिवसापासून अध्यापन सुरू झालं. यात हनुमान जयंतीच्या दिवशी संपूर्ण कुटुंबासोबत बसून माझ्या वर्गातल्या मुलांनी मारुती स्तोत्र म्हटलं. पालकांनी आयुष्यात पहिल्यांदाच असं एकत्रित स्तोत्र म्हटल्याचं कबूल केलं आणि आमच्या मुलांचं मारुती स्तोत्र पाठ आहे हे नव्याने समजल्याने नमूद केलं.

त्यानंतर आकृतिबंध जो फळयावर विविध आकृतींच्याद्वारे शिकवला जायचा तो यावेळी मुलांनी घरात असलेल्या विविध वस्तूंचा प्रत्यक्ष वापर करून बघितला. इतक्या वस्तू शाळेत आम्हाला कधीही उपलब्ध झाल्या नसत्या. त्यानंतर "पाहू तरी शरीराच्या आत" ह्या पाठाअंतर्गत मुलांनी यूट्यूबवर प्रत्यक्ष शरीराच्या आतील कार्यपद्धती समजावून घेतली. मी ऑनलाईन शिक्षणाअंतर्गत एक अनोखा उपक्रम घेतला. मुलांच्या घरी जाणं कधीच शक्य होत नाही म्हणून इंग्रजीतून आपल्या घरातल्यांची आणि घराची ओळख करून देणं असा सदर उपक्रम होता. यात मुलांनी त्यांच्या घरातील विविध खोल्या, त्यांची खेळायची जागा, अभ्यासाची जागा नाचत नाचत दाखवली.

कुंटुंबियांची ओळख करून देताना सध्या गावाकडे असलेल्या विद्यार्थ्यांनी त्यांच्या शेतातल्या पाळीव प्राणी यांचीही ओळख आम्हाला सगळयांना करून दिली. माझ्यासाठी आणि माझ्या सर्व विद्यार्थ्यांसाठी खूपच आनंददायी उपक्रम ठरला. १ मे महाराष्ट्र दिनानिमित्ताने

पारंपरिक महाराष्ट्रीयन वेशभूषा करून आम्ही महाराष्ट्र गीत गायलं, महाराष्ट्राची माहिती मिळवली. ऑनलाइन शिक्षणामध्ये वर्गात जसा प्रत्यक्ष संवाद साधता येतो तसा साधता येत नाही ही त्रुटी भरून निघण्यासाठी जास्तीत जास्त अभ्यास हा विविध प्रयोग, चित्रे, कागद काम अशा  प्रात्यक्षिकाद्वारे घेतला. अशा पद्धतीने ऑनलाइन शिक्षण ही काळाची गरज असल्याने तिचा आम्ही मनापासून स्वीकार केला असला तरीही वर्गात शिकवण्याची मजा काही औरच असते. म्हणून लवकरच करोनारुपी संकट दूर होऊन पुन्हा एकदा शाळेतील विद्यार्थ्यांचा चिवचिवाट ऐकू यावा हीच मनस्वी इच्छा!!

**ज्योती रत्नपारखी-वालझाडे,**
**शिशुविहार व बालक मंदिर, मराठी माध्यम १ली ते ४थी**



# आमची अशीही मदत...

उन्हाळा येणार म्हटलं की, भोंसला ॲडव्हेंचर फाउंडेशनची तयारी सुरू होते ती उन्हाळी साहस शिबिरांची! या वर्षी जानेवारीमध्ये या शिबिरांसाठी होणाऱ्या प्रवेशांचा वेग तसा कमी होता आणि त्यातच चीनमध्ये कोरोना  या महारोगाने थैमान घातलं होतं. यामुळे पुढे आपले शिबिरे कशी होतील याची चिंता सतावू लागली.परंतु आपल्याकडे महारोग येणार नाही असा विचार करत या शिबिरांच्या प्रवेशांवर टीमने लक्ष केंद्रीत केले.

या उन्हाळयात नाशिक मध्ये ७ शिबिरे तर हिमालयात २ ट्रेक असे नियोजन केले होते व त्यासाठी आवश्यक असणारी सर्व तयारी सुरू केली पण आपल्या देशात आणि नंतर राज्यात कोरोना रुग्ण मिळाले आणि चिंता अजूनच वाढली. कोरोनाग्रस्तांची संख्या वाढतच गेल्याने पुढे लॉकडाऊन घोषित झाला. या आलेल्या जागतिक आपत्तीत सोशल डिस्टनसिंग पाळणे गरजेचे आहे.  म्हणून आहे त्या ठिकाणी आपल्या घरात सुरक्षित राहा असे आव्हान आपले मा. पंतप्रधान यांनी केले.

वर्षभर डोंगरात फिरणाऱ्या गिर्यारोहकाला घरात बसणे म्हणजे जेलमध्ये डांबून ठेवण्यासारखे आहे आणि ते पण एप्रिल, मे महिन्यात! हे दुहेरी संकट वाटू लागले, परंतु नेहमी साहस करत  असतांना आपत्तीशी सामना करण्याची तयारी असते. या कोरोनासारख्या आपत्तीत आपल्याला मदतीसाठी काय करता येईल असा विचार मनात सतावू लागला.परंतु या आपत्तीत जोखीम मोठी असल्याने व ही संसर्गजन्य आपत्ती असल्याने मदतीसाठी मर्यादा निर्माण झाल्या. लॉकडाऊन असल्याने रक्तपुरवठा कमी पडत असल्याची बातमी कानावर पडताच बिटको हॉस्पिटलसोबत संपर्क करून दि. १ एप्रिलला गावात रक्तदान शिबीर आयोजित केले. पण मनाला पाहिजे तेवढे समाधान नाही मिळाले.

आपल्या संपूर्ण टीमने महाराष्ट्र  गिर्यारोहण महासंघ, मुंबईने घोषीत केलेल्या टास्क फोर्स मध्ये नावे नोंदवली. या टास्क फोर्स मध्ये महाराष्ट्रातून १५०० पेक्षा अधिक गिर्यारोहकांनी आपले नावे नोंदवली. आज ही टास्क फोर्स शासनाच्या पुढील आदेशाच्या प्रतीक्षेत आहे. ही टास्क फोर्स मा. ऋषिकेश यादव सर (कार्याध्यक्ष) व मा. उमेश झिरपे सर (अध्यक्ष) महाराष्ट्र  गिर्यारोहण महासंघ, मुंबई यांच्या मार्गदर्शनाखाली तयार करण्यात आली. या कोरोनासारख्या आपत्तीत सेवा करत असलेल्या सर्व डॉक्टर, पोलीस व इतर सर्वांना  सलाम  आणि नक्कीच आपण या आपत्तीला हरवून यातून बाहेर पडू  असा विश्वास वाटतो.

**संतोष जगताप. प्रमुख, भोसला □डव्हेंचर फाउंडेशन**

# एक नवी संधी

मध्यवर्ती हिंदू सैनिकी शिक्षण मंडळ संचलित शिशुविहार व बालक मंदिर इंग्रजी विभागातर्फे सर्व शिक्षक वाचक प्रेमींना मनःपूर्वक सादर प्रणाम.

आधुनिक तंत्र विज्ञानाचा जादुई अविष्कार अनुभवावा तितका कमीच वाटतो सद्यस्थितीत ह्या सगळयांची पुरेपूर मदतच आपण घेतोय हेच खरे! stay home , stay safe हा आरोग्यदायी मंत्र जगत असताना बाह्य वस्तूंची कवाडे आपल्यासाठी अंतर्मनासाठी नक्कीच क्लेशदायक आहे तरी प्रतिकूलतेतही आपण न थांबता खूप काही नवलाई घडवू शकतो याचाच प्रत्यय देणारा हा काळ म्हणून आपण स्विकारला आहे.

**आद्या, शुभदा, भगवती**
**आद्य पूजनीय माता सरस्वती**

तिच्याच भक्तीचा हा कृपाप्रसाद आपण आपल्या घरात राहून मिळू शकतो, आणि या सगळयांचे लाभार्थी आपले विद्यार्थीदेखील आहेत याचा आनंद द्विगुणित आहे अर्थातच लॉक डाऊन काळात ऑनलाइन □पच्या स्वरूपात जणू हे वरदानच!

ऑनलाइन शिकवणे आणि शिकता येणे ही परस्परपूरक आनंद पर्वणी सुरू होताच आमच्या प्राथमिकच्या विद्यार्थ्यांनी या ज्ञान डोहात यथेच्छ आनंद लुटण्यासाठी, प्रयत्न रूपी उड्या घेण्याचा खटाटोप सुरू केलाय. कसं? ते बघा आणि तुम्हीपण या आनंद डोहात चिंब भिजा.

स्वतःच्या कारागिरीचे , कौशल्याचे पुरावे जणू मुलांनी घरभर साक्षी ठेवले आहेत. यामध्ये हे किचनमधील चटपटीत पदार्थ बनवणे असो वा टाकाऊ वस्तूपासून टिकाऊ वस्तू असो! जिव्हा तृप्तीबरोबरच घरातील जुन्या वस्तूंना नवीन लुक देत जुने रूपडेच पालटले.

दरम्यानच्या काळात, भारतीय संस्कृतीचे पथदर्शक आणि आपल्या माननीय संस्थेचे आदर्श प्रभू श्रीरामांचा जन्मोत्सव-

रामनवमी सुद्धा आपण साजरी केली. शाळेतील विद्यार्थ्यांसाठी वक्तृत्व स्पर्धेचे आयोजन केले होते. या स्पर्धेचे ध्वनि चित्र मुद्रण झाले. आपल्या छोट्या रामसेनेने त्याला प्रचंड उत्साहात प्रतिसाद दिला. शिवाय, भारतरत्न डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांच्या जीवन कार्याची माहितीदेखील मुलांनी व्हिडिओद्वारे सादर करून त्यांना मानवंदना देत जयंती साजरी केली. याच बरोबर अभ्यासपूर्वक साहित्य तयार करणे गीतगायन, वादन, सुबक सुंदर चित्रकला अशा नानाविध रुपात आपल्या शिक्षणाची चौरंगी उधळण करणाऱ्या या सर्व विद्यार्थ्यांना कायमच मनापासून शुभेच्छा आणि यशस्वी भव!

आदरणीय संस्थेने या सगळयांच्या पुढाकाराने सारी ज्ञानदालने खुली करून दिली. वर्तमान परिस्थितीत जनजागृतीसाठी भारतीय भाषांची गुंफण करीत संदेशगीताचा व्हिडीओ संबंधित शिक्षकांच्या सहभागाने यशस्वी केला. इतकेच नाही तर सर्व विभागांच्या शिक्षकांसाठी दररोज विविध उपयुक्त विषयांना बोलके करत शिक्षक प्रशिक्षण वर्गाचे देखील आयोजन याच काळात केले. संस्थेअंतर्गत शाळांमधील विद्यार्थ्यांना सहभागी करत जनजागृती सुरक्षितता यासाठी प्रोत्साहित केले.

विद्येची उपासना करण्याची ही अनमोल संधी आमच्या वंदनीय संस्थेने आम्हाला देऊ केली त्याबद्दल मनःपूर्वक ऋणी आहोत. तसेच, शाळेच्या मुख्याध्यापिका माननीय सौ. साक्षी भालेराव मॅडम यांचे मनापासून धन्यवाद. त्यांच्या मार्गदर्शन आणि सहकार्याशिवाय हे सारे प्रकट होणे केवळ अशक्य.

मनात घर केलेल्या या आठवणींसह मनापासून धन्यवाद!

**मानसी कुलकर्णी, शिशुविहार बालक मंदिर इंग्रजी माध्यम**



# कलेमुळे मिळाली सकारात्मक दृष्टी

अचानक सर्वच बंद....एकमेकांना भेटणे ,बोलणे,चर्चा करणे,नविन विषयांची ओळख होणे,विविध गोष्टीत भाग घेणे,सगळंच बंद.कारण सुरू झाले ते लॉकडाऊन. संध्याकाळी प्रसारमाध्यमातून फक्त आणि फक्त कोरोना विषय व त्यामुळे बळी गेलेला माणूस. सुरुवातीला संचारबंदी मग लॉकडाऊन ठेवण्यात आले त्यामुळे सगळेच घरात बसले.तस पाहिलं तर एक शिक्षिका असल्याकारणाने मे महिन्यात असणाऱ्या सुट्टीची सवय होतीच .पण अशा कारणाने घरी बसणे नंतर -नंतर असह्य होऊ लागले. .सगळं जग बदलल्यासारख दिसलं.दहा ते बारा दिवस असेच विचारांच्या कल्लोळात गेले.आणि एक दिवस नव्याने एका वेगळया आशेच्या किरणाने सुरुवात झाली.... कोणीतरी लिहून ठेवलेले वाक्य आठवले .तुमच्यातील कला तुम्हाला कुठल्याही परिस्थितीत जिवंत ठेवू शकते.. कलेच्या दृष्टिकोनातून घरातील उपलब्ध साहित्यातून माझी कला नव्याने पुढे येत होती.अगदी स्वयंपाक करताना नवीन नवीन कल्पना पूर्ण होत होत्या.या दिवसात माझी बाग अधिकच फुलली. .झाडामध्येही मी कलेचा वापर केला.पणत्या ,पाईप,दह्याचे रिकामे डबे यांसारख्या साहित्याचा वापर करून मी अनेक किडे तयार केल,.बाहुली तयार केली,मुलांच्या लहानपणीच्या खेळण्याचाही वापर बागेत केला.रंगीबेरंगी खेळण्यातील काठयांवर बागेतील वेल चढवला.छोट्या- छोट्या साहित्यातून घसरगुंडी तयार करून त्यावर किडे बसविले.चिमण्यांच्या खाण्याच्या सोयीसाठी वेगळी शक्कल लढवली..चित्रकलेची आवड असल्याने अनेक प्रकारची चित्रे काढणे, रांगोळया काढणे,दागिने तयार करणे,मुलाला चित्रकलेच्या नवनवीन पद्धती शिकविणे,घरात स्वच्छता करणे,घरातल्यांची आवड जपणे .यात मी वेळ घालवायला लागले.पाककलेची आवड असल्याने विविध प्रकारचे पदार्थ तयार केले.मनसोक्त खाण्याचाही आनंदही घेता आला.

हे सर्व चालू असताना अचानक अजून एक आनंदाची घटना घडली.सर्व घरातील कामे आटपून मी सोफ्यावर निवांत टेकले तर माझ्या घराच्या खिडकीच्या बाहेर असलेल्या एका छोट्याशा झाडावर एक पक्षी मला दिसला.थोडी उठून पुढे जाते तोच पक्षी उडून गेला.खिडकीपाशी जाताच चेहरा आनंदित होऊ लागला. कारण,लक्षात आले की त्या छोट्याशा झाडावर पक्षाने घरटे केले होते. खूप आनंद झाला.दोन ते तीन दिवस आम्ही घरातील सर्वजण पक्ष्याची घरटयाजवळ पुन्हा पुन्हा येऊन बसण्याची गंमत बघत होतो . एक दिवस त्या घरट्यात तीन अंडी दिसली .तेव्हा पासून प्रत्यक्ष पिल्लांचा जन्म होईपर्यंत सगळा काळ आम्ही त्याचं निरीक्षण केले.

घरात सतत चर्चा चालू होती.निसर्गाने दिलेला हा एक सुखद अनुभव होता, जो या लॉकडाऊनच्या वाईट काळात मिळाला.आपण जर सकारात्मक दृष्टिकोन ठेवला तर सर्व सकारात्मक घडते याचा प्रत्यक्ष अनुभव मी घेतला.जिथे इतर दिवसात माणसांची वर्दळ होती .तिथे आज माणूसच नव्हता म्हणून या पक्ष्याने घरटे बांधले.लक्षात आले की,खरचं निसर्गावर आपण किती हक्क दाखवतो. जेव्हा की,या निसर्गाची खरी गरज पशु- पक्ष्यांना आहे.माणसाला सर्वच हवे असते. मला आलेल्या लॉकडाऊन काळातील या अनुभवातून मी शिकले की,आजही काहीच बदललेनाही.सगळे इथेचआहेआपल्यापाशी.फक्त विचार व दृष्टिकोन बदलावा लागेल .
पुन्हा नवीन दृष्टी....... नवीन शोध सुरू झाला.............

**•सौ.सुनीता घोटकर, विद्याप्रबोधिनी प्रशाला मराठी माध्यम**



# लॉकडाऊनच्या परिस्थितीत केलेले अध्यापन व मार्गदर्शन

भोंसला मिलिटरी स्कूल,नाशिक ही निवासी शाळा आहे,शाळेत इयत्ता ५ वी ते १२वी पर्यंतचे विद्यार्थी मुंबई,पुणे गुजरात, कोकण अशा भारतातील वेगवेगळया शहरातून शिकण्यासाठी आलेले असतात. जानेवारी २०२०,नेहमीप्रमाणे शाळा सुरू होती,शैक्षणिक वर्षाचा शेवटचा टप्पा ,अभ्यासक्रम पूर्ण करणे ,परीक्षांचे नियोजन करणे इ. कामे चालू होती शाळेतील विद्यार्थ्यांना सकाळी वर्तमानपत्र व संध्याकाळी दूरदर्शन वरील बातम्या दाखवण्यात येत असे. याच महिन्यात चीन मध्ये कोरोंना विषाणूने थैमान घातले होते विज्ञान शिक्षिका असल्याकारणाने विद्यार्थी विज्ञानाच्या तासाला कोरोना विषाणू बद्दल विचारायचे आणि बघता बघता मार्च महिन्यातील १४ तारखेपासून शाळा बंद ठेवण्याचा निर्णय शासनाने घेतला.

विषाणूचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी योग्य ते पाऊल शासनाने घेतले. हळूहळू लॉकडाऊन वाढतच गेले. शाळा बंद ठेवण्यात आल्यामुळे सर्वच पालक,शिक्षक,विद्यार्थी यांच्यात संभ्रमाचे वातावरण होते. नानाविध प्रश्न समोर आले. विद्यार्थ्यांची परीक्षा कशी होणार?वगैरे. विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होणार नाही यासाठी काय योजना करता येईल. यावर सेंट्रल हिंदू मिलिटरी एज्युकेशन सोसायटीच्या सर्व पदाधिकाऱ्यांनी चर्चा करून तंत्रज्ञानाचा उपयोग कसा करून घेता येईल,तसेच प्रत्येक विद्यार्थ्यांपर्यंत कसे पोहचता येईल हा सकरात्मक विचार करून आणि तात्काळ योजना अंमलात आणून आयटी शिक्षकांच्या मदतीने इतर सर्व शिक्षकांना झूम □पचे प्रशिक्षण देण्यात आले.

संगणक,तंत्रज्ञानाच्या प्रगतीमुळे सर्वच क्षेत्रे या अद्भुत यंत्राने व्यापून टाकली आहे.देशामधील संगणक इंटरनेटचे अविभाज्य अंग बनलेले आहेत. तंत्रज्ञानाचा उपयोग करून सर्व विद्यार्थ्यांचे ऑनलाईन वर्ग घेण्याचे निश्चित झाले. पालकांना कळविण्यात आले. पालक व विद्यार्थी खूप खुश झाले. हा एक नवीन उपक्रम होता.घरीच राहून आपल्या शिक्षकांबरोबर विद्यार्थ्यांना संवाद साधता येणार होता. तेही एकत्रितपणे संस्थेने सुरु केलेल्या उपक्रमाबद्दल पालकांनी पदाधिकाऱ्यांचे मनोमन आभार मानले व अभिप्रायही कळवले.

प्रशिक्षणानंतर शिक्षकांनी ऑनलाईन वर्ग घेण्यासाठी तयारी सुरू केली. शाळा जरी बंद होत्या तरी ऑनलाईनवरुन प्राचार्य,शिक्षक , पदाधिकारी यांच्यात वेळोवेळी सभा घेऊन, सर्वांशी संवाद साधून अडचणींचे निरसन केले. नियोजित वेळापत्रकाप्रमाणे विद्यार्थ्यांचे नियमित ई-वर्ग सुरू झाले. सुरुवातीला शिक्षकांना ऑनलाईन शिकवतांना अडचणी आल्या. ऑनलाईन कसे जोडायचे?वेळापत्रक कसे तयार करायचे?लिंक कशी पाठवायची?इ. शिक्षकांकडे लॅपटॉप किंवा संगणक होतेच असे नाही पण भ्रमणध्वनीचा उपयोग बऱ्याच शिक्षकांनी शिकवण्यासाठी केला.

शिक्षकांनी तंत्रज्ञानाचा उपयोग करून ई-पुस्तक ,चलतचित्राचा उपयोग,तसेच पीपीटी तयार करून विद्यार्थ्यांसमोर प्रस्तुत करत होते. विद्यार्थीही ई- वर्गाचा आनंद घेत होते.आपल्या आवडत्या शिक्षकांबरोबर संवाद साधून शंकांचे निरसन करून घेत होते. हे सर्व करत



असतांना बऱ्याच सुविधांच्या अभावाला  शिक्षकांना सामोरे जावे लागले. कधी भ्रमणध्वनी/ संगणकाच्या माध्यमातून आदान-प्रदान करण्याच्या साधनात अडचणी येत होत्या. . वर्ग घेत असतांना एखादा नटखट विद्यार्थी त्याला अवगत असलेल्या तंत्रज्ञानाचा उपयोग करून त्याची हुशारी दाखवून नवीन पेच उभा करायचा. यावर शिक्षकांनी उपाय शोधायचा. असे सुरूवातीच्या काळात नवीन नवीन संशोधन सुरूच होते. त्यामुळे शिक्षकही रोज नवीन गोष्टी शिकत गेले. आत्ताची  पिढी ही तंत्रस्नेही असल्यामुळे भ्रमणध्वनीचे वैशिष्ट्ये आत्मसात आहे.  परंतु शिक्षक मात्र एक एक नवीन तंत्र रोजच शिकत होते. आज शिक्षक उत्तम प्रकारे ऑनलाईन वर्ग घेऊ शकतात.  संस्थेने ऑनलाईन वर्ग घेण्याचा नावीन्यपूर्ण उपक्रम घेऊन शिक्षकांच्या ज्ञानात भरच टाकली आहे. काळाची गरज ओळखून नवीन तंत्रज्ञानाचा अतिशय सुंदर आणि योग्य उपयोग अणीबाणीच्या काळात केला. त्या बद्दल सर्व पदाधिकाऱ्यांचे आभार. विद्यार्थ्यांप्रमाणेच संस्थेने भोंसला परिवारातील शिक्षकांसाठी व्याख्यानांचे आयोजन केले. नवीन उपक्रम करण्यास संस्था नेहमीच प्रोत्साहित करत असते.

खऱ्या अर्थाने आज तंत्रज्ञानाचा उपयोग विद्यार्थी आणि शिक्षक यांना एकत्र जोडू शकला. भारतातील वेगवेगळया शहरातील भोंसलाचे विद्यार्थी देशभरात अंतराने लांब असूनही, एकाच वेळी एका छताखाली  मनाने,विचाराने जवळ बांधलेली आहेत

**सौ. स्वाती विनोद शिंदे, विभाग प्रमुख, भोंसला मिलिटरी स्कूल**



# अंधारातील उजेड

सध्या आपण सर्व जण सक्तीने का होईना पण घरात आहोत त्या मुळेच बऱ्यापैकी फावला वेळ मिळत असतो. हा वेळ मिळाला तो एका छोट्याशा विषाणू मुळे.खरच गांभीर्याने विचार करण्याची वेळ आणली आहे. या एका छोट्याशा विषाणूने हतबल होऊन गेले बलाढ्य देशसुध्दा . पण आपला देश यावर लवकर विजय मिळवेल ही कल्पना मनाला दिलासा देऊन आहे.

या बिकट परिस्थितीत आपल्या देशाचे पंतप्रधान मोदी यांनी अंमलात आणलेले विविध प्रकारचे उपक्रम हे देखील उल्लेखनिय आहेत. त्यात काहींनी तो वादविवाद, काहींनी हास्यास्पद विषय म्हणून घेतला तर अनेकांनी गांभीर्याने विचार केला. कोरोना मुळे जग हैराण झालय.आपण खारीचा वाटा उचलून देशाच्या प्रती आपलं देणं, आपलं कर्तव्य पार पाडावे व पंतप्रधान मोदी यांना पाठिंबा दयावा.

चिमुटभर मीठ उचलून देशाला स्वातंत्र्य नक्कीच मिळणार नव्हते पण राष्ट्रीय एकजुटीचे दर्शन घडावे म्हणून गांधीजींनी मीठाचा सत्याग्रह केला आणि तिथूनच पुढे स्वातंत्र लढ्याला उर्जितावस्था मिळाली. याचप्रमाणे कोरोनावर विजय मिळवायचा असेल तर ज्या गोष्टी आपल्याला छोट्या छोट्या विनाकारण वाटतात त्यातूनच खरी विजयाची सुरूवात होते.आजकाल सोशल मीडिया, साधना मार्फत विविध प्रकारचे दाखले जनजागृतीसाठी दिले जात आहेत. विविध चित्रांद्वारे,नाटयाद्वारे त्याचे गांभीर्य समाजासमोर मांडले जात आहे.काळजीपूर्वक दखल घेतली जात आहे. खरंच कोरोनाचे तांडव भयंकर आहे. त्यावर मात करणे कठीण आहे पण विजय मिळवणेही अशक्य नाही. सर्वांनी सरकारचं ऐकून नियमांचे काटेकोरपणे पालन करुन,आपल्या भारत देशाला कोरोनामुक्त करू या.

जीत जायेगे हम
तुम अगर संग हो.
देशभक्ती दिखाईये
सरकार और प्रशासन को
सहायता करे
घर से बाहर न निकले
घर मे रहिए सुरक्षित रहिए
भारत विजयी भव
जय हिंद

**श्रीमती. स्वाती पवार, शिशु विहार आणि बालक मंदिर मराठी माध्यम १ली ते ४थी**



# असा ही अनुभव ऑनलाईन शिक्षणाचा .....

‘ ज्ञानरचनावादाची घेऊन हाती पणती, या कोवळया मुलांची पेटवू या ज्ञानज्योती ,

घेऊ या ज्ञानदीप हाती ,अंधार घालवूया,

बालकांचे अज्ञान दूर करू या, या लाजऱ्या कळयांना फुलवित सर्व नेऊ !

डिजिटल शिक्षण देऊनी आनंद मंत्र देऊ ! विश्वात बालकांच्या आनंद सर्वत्र फिरवू ! ’

पूर्वीच्या काळापासून सुरु असलेली परंपरागत शिक्षण पद्धती आणि खडू फळा मोहिमेला ब्रेक दिला तो ज्ञानरचनावादी शिक्षणातून .. मी शाळेत शिकत असतांना चिऊताईची गाणी , बडबडगीत आमच्या बाई स्वतः गाऊन दाखवत असत. पण जसा जसा काळ पुढे चाललायं तसं आपल्या शिक्षण प्रक्रियेत बदल होतांना दिसतायेत. ते हवेच.. आताची स्मार्ट मोबाइल युझर पिढी इ लर्निंग शिक्षणाचे धडे गिरवतांना पाहायला मिळतेय.त्याचाच एक शिक्षक या भूमिकेतून अनुभव मी देखील घेतला तो भोसलाच्या विद्या प्रबोधिनी प्रशालेत शिक्षिका म्हणून ...

आज एका वैश्विक आपत्तीला सारा देश तोंड देत असतांना त्यात सामाजिक उत्तरदायित्वासोबत ऑनलाईन शिक्षणातून आमच्या प्रशालेच्या विद्यार्थ्यांना ज्ञानार्जनाचे अनुभव आम्ही देत असल्याचा आनंद देखील वाटतो. ही संधी मिळाली लॉकडाउनच्या काळात संस्थेने दिलेल्या ऑनलाईन शिक्षणाच्या रूपाने ... विविध विषयांचे इयत्ता ९ वी ते १० वी च्या मुलांना आमची शाळा रोज २ तास अध्ययन करून घरबसल्या आनंददायी शिक्षणाचा अनुभव देत आहे. आमचे विद्यार्थी तेवढ्याच उत्साहाने सहभाग नोंदवत, परस्परांमध्ये संवाद साधण्यात पुढाकार घेऊ लागल्याचे सकारात्मक चित्र निर्माण झाले आहे.

कोणत्या ॲपच्या साहाय्याने हे शिक्षण आम्ही मुलांना देणार आहोत याची उत्सुकता लागून होती. संस्थेने आम्हाला ऑनलाईन शिक्षणाचे विशेष प्रशिक्षण देऊन त्याद्वारे प्रभावी अध्ययन कसे करावे याविषयी प्रशिक्षित केले. त्यानुसार शाळेने विद्यार्थ्यांचे ग्रुप तयार केले . पालकांनी देखील त्याला सकारात्मक प्रतिसाद देऊन आपल्या पाल्यांना सहभागी होण्यास प्रोत्साहित केले. यामुळे आमचे खऱ्या अर्थाने ऑनलाईन वर्ग सुरु झाले. मी देखील संस्कृत विषयाचे अध्यापन पुस्तकाच्या पीडीएफच्या साहाय्याने केले. त्यावेळी स्क्रीन शेयर ऑप्शनच्या साहाय्याने नवनवीन व परिणामकारक अनुभूती विद्यार्थ्यांना कशी द्यावी हे शिकायला मिळाले.

एकूणच ऑनलाईन शिक्षणातून हा आनंददायी अभ्यास विद्यार्थ्यांकडून करून घेतांना मनावर कोणतेही दडपण आले नाही उलट एका नव्या शिक्षणाच्या मंचावर काम करण्याची संधी लाभल्याने आपण अजून अद्ययावत आणि टेक्नोसॅव्ही शिक्षक बनू शकतो याची प्रचिती आली. यापुढेही ज्ञानाचा हा यज्ञ अविरतपणे चालू ठेवत विद्यार्थी हे दैवत मानून, अशा अभिनव ऑनलाईन शिक्षणरुपी उपक्रमातून आम्ही मुलांचा सर्वांगीण विकास घडवू अशी संस्थेला हमी देते.

भोसला हा परिवार असून त्या परिवाराचे कुटुंब प्रमुख म्हणून आणि आम्हाला सतत प्रेरणा देणारे संस्थेचे सर्व पदाधिकारी, आमच्या

प्रशालेच्या मुख्याध्यापिका आणि मार्गदर्शक सौ शुभांगी वांगीकर मॅडम यांचे मी शतशः ऋणी आहे की या उपक्रमामुळे आम्हा शिक्षकांना आमच्यातील सुप्त गुणांना वाव देण्याची संधी उपलब्ध करून दिली. शेवटी पुढील ओळीतून माझा भावना व्यक्त करते आणि माझा लेखाला पूर्णविराम देते ..

‘ कितना सुंदर कितना प्यारा भोसला पाठशाला का परिवार हमारा ,
कई सालोसे यहा शिक्षा कि सेवा जारी है ! लाखो छात्र ने शिक्षा पाकर अपनी जिंदगी सुधारी है !
इस भोसला पाठशाला का व्यक्तित्व न्यारा, यह पाठशाला परिवार हमारा !
सर्व धर्म के छात्र यहा उच्च शिक्षा पाते है ! जीवन को सुखी बनाने का मंत्र यहा से लेते है ! ’

**सौ. यामिनी तेजस पुराणिक, विद्या प्रबोधिनी प्रशाला मराठी माध्यम**



# कोरोना - आयुर्वेदाची साथ

जगभरात मानवी आरोग्यावर आक्रमित झालेला आणि सर्वच वैद्यकिय चिकित्सा, उपचार पध्दतीस अपरिचित, नवखा व आव्हानात्मक ठरलेला कोविड - 19. म्हणजेच " कोरोना " या विषाणुचे थैमान थोपवण्याचा प्रभावशाली उपचार, सूत्रबध्द, संरक्षित, व्यक्तिगत स्वास्थ्य जागृत जीवनपध्दतीचा अवलंब, हाच असल्याचे आत्ता तरी निष्कर्ष समोर आले आहेत.

एकीकडे सामाजिक, सामुहिक जीवनपध्दतीत पाळावयाचे, अंगिकारण्यास कठोर वाटणारे पण सवयीने सहज जमणारे नियम आहेत, तसेच व्यक्तिगत व कौटुंबिक दैनंदिन जीवनात काही सवयीरुपी नियम पाळले तर कोरोना वा तत्सम संसर्गजन्य आजारांपासून स्वत:ला व कुटुंबास दूर ठेवण्यास सहाय्यक ठरेल.

भारतीय जीवनपध्दतीत स्वास्थ्य आणि चिकित्सा यात आयुर्वेद व योगशास्त्र यांस अनन्य साधारण स्थान आहे, किंबहुना ही दोन्ही शास्त्रे आपल्या भारतीयांच्या जन्मापासूनच दैनंदिन जीवनपध्दतीतील अविभाज्य भाग आहे. " प्रतिबंध हा उपचारापेक्षा महत्वाचा " हा आरोग्यशास्त्रातील मूलमंत्र जगाला सर्वप्रथम देणारा आयुर्वेदचं.

दैनदिन जीवनात सहज अंगिकारू शकता येणा-या सवयी

१. सुर्योदया बरोबरीनेच दिनचर्या सुरु करणे

२. शारिरीक व्यायाम व प्रामुख्याने योगासने यांस नियमित वेळ देणे

३. ध्यानसाधना, मौनसाधना अंगिकारण्याचा प्रयत्न करणे.

४. संतुलित, स्वच्छ आहाराचे वक्तशीर सेवन करणे.

५. सहज उपलब्ध आैषधी पदार्थ जसे की कडुलिंबाचा पाला, तुरटी, भीमसेनी कापूर यांचा वापर स्नानाच्या पाण्यात करणे.

६. आयुर्वेदात उल्लेखलेल्या आरोग्यवर्धक व पचनप्रक्रियेस सहाय्यक पदार्थ जसे की च्यवनप्राश यांचे नियमित सेवन करणे.

७. अनैसर्गिक स्त्रोतांचा जसे की एअर कंडीशनर, कुलर, फ्रोझन फुड इत्यादींचा वापर शक्य तितका टाळणे.

सध्याच्या परिस्थितीत,

"कोरोना समय येता, कोण कामासी येतो,
जो स्वत:ची काळजी घेतो तो, तरून जातो."

अशीच सर्वांची अवस्था आहे, अशा प्रसंगाचा संधीरुपी उपयोग करून सकारात्मक बदलातून स्वत:च्या आरोग्य रक्षणासाठी अंगिकारलेल्या सवयी या अंतिमत: संपूर्ण राष्ट्राच्या आरोग्यहितालाही पूरक आहेत. आपल्या बरोबरीनेच संपूर्ण देश आरोग्य संपन्न करण्याची ही संधीच आहे.

**सोनाली अकोलकर, विद्याप्रबोधिनी प्रशाला, इंग्रजी माध्यम**



# नातं जगवायचं...!

जनता कर्फ्यु रविवारचा दिवस. नाशिकहून भर उन्हात गावी आलो. केवळ आणि केवळ या कोरोना सारखा यमदूता पायी ! स्वतःच्या फायद्यासाठी काहीही करण्यासाठी तयार आहे. सृष्टीची हानी तर करतोच; परंतु इतर मानवांची हानी करण्यासाठीही तो पुढे मागे बघत नाही. आज आपण सर्व मिळून, चिकित्सा क्षेत्रात कार्य करणारे व जे कोरोनाग्रस्त व्यक्तींच्या सेवेत आपल्या स्वतःच्या जीवाची पर्वा न करता निःस्वार्थपणे सेवाकार्यात झोकून घेतले आहे त्यांना परमेश्वराची कृपा व शक्ती, तसेच त्यांच्या कार्यात त्यांना यश प्राप्त व्हावे म्हणून आपण प्रार्थना करू या "देवा ह्या रोगावर लवकरात लवकर औषधोपचार मिळावा व जे लोक ह्या रोगास बळी पडले आहेत, ते लवकरात लवकर बरे व्हावेत आणि सर्वत्र चांगले आरोग्य प्रस्थापित व्हावे

अंधारातून प्रकाशाकडे जाणं असू द्या, किंवा पराजयावर मात करणं असू द्या , सगळयाला कुठेतरी आत्मिक, शारिरीक , बळ द्यावेच लागते. आलेल्या कोरोनाच्या संकटाला सामोरे जाण्यासाठी मानसिक, शारीरिक, आर्थिक, सामाजिक परिस्थितीशी दोन हात करण्यासाठी प्रशासन आणि कर्मचारी सर्वच आपापल्या धरतीवरती अहोरात्र प्रयत्न करत आहेत. यापूर्वी आलेले प्लेग, पटकी, देवी यासारखे साथीचे रोग आपल्या पूर्वजांनी अनुभवले आणि त्याच्याशी दोन हात करत जीवांचा आणि जीवनाचा रामरगाडा चालविला. आपणा सर्वांना पूर्वीची परिस्थिती ज्ञात आहेच वेगळे सांगावयास नको.

प्रशासनाने, समाज माध्यमांनी डॉक्टर्स, नर्सेस,पोलीस कर्मचारी,सिनेसृष्टीतील सर्व कलाकारांनी समाजकार्य करणाऱ्या आणि समाजाचे देणे कोणत्यातरी माध्यमातून चुकवू पहाणाऱ्या सर्वांनी सर्वतोपरी या वणव्यातून मुक्तता व्हावी म्हणून प्रयत्नांची पराकाष्ठा केली आहे. एकीकडे कोरोनाच्या व्हॅक्सिनसाठीची शोधमोहीम , दुसरीकडे कोरोनाचा अमर्यादित आकडा यांच्यामुळे, सगळया सोयी-सुविधा बंद कराव्या लागल्या त्याला जवळजवळ दोन महिने होत आले. एवढे मोठे देशावरचे आर्थिक नुकसान यापूर्वी कधीही ओढवल्याचे आपणापैकीं कोणीही पाहिले नसेल. समाजातल्या प्रत्येक सुज्ञ घटकाने आपापल्या परीने त्याचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी आणि त्यातून ओढवणाऱ्या मानसिक, आर्थिक , शारीरिक उदासीनतेला थोपवण्यासाठी भिन्न प्रयोगांच्या मदतीने पुढाकार घेतला आहे .

सध्याची आव्हाने आणि हा प्रसंग निवळल्यानंतर लोकांना आकाशाचे छत ,धरणीमाईची कुशी करावी लागणार आहे. हे सगळे असेच चालू राहिले तर या बेलगाम धावणाऱ्या घोड्यांमुळे सगळे जमीनदोस्त व्हायला वेळ लागणार नाही .याची जाणीव लोकांना कधी होईल याची खंत वाटते. वणवण भटकणाऱ्या आणि हातावरचं पोट असणाऱ्यांसोबतच सामान्यांचा देखील रोजीरोटीचा यक्ष प्रश्न होऊन बसेल.

येणाऱ्या आर्थिक टंचाईला सामोरे जायला मानसिक, शारिरीकरित्या खंबीर करावे, मनोबल वाढवावे यासाठी वेगवेगळया अनुभव संपन्न पुस्तक, कादंबऱ्या, उद्योजकांचा लिखित किंवा सामाजिक माध्यमांवरील ब्लॉग आणि लेखांचा अभ्यास करावा, जेणेकरून आपण

एकमेकांना उभे रहाण्यास सहाय्य करू. तसे पाहिले तर पूर्वी जी आंदोलने, युद्धे,लढाया, झाल्या त्या सगळयाहून आताची परिस्थिती सुलभ म्हणावी लागेल कारण आता फक्त घरी बसून रहायचे आहे आणि आपल्या देशाला वाचवायचे आहे.

या लॉकडाऊनच्या दिवसांत बरेच शिकायला मिळालंय. कोरोनाने आज संपूर्ण जगाला लॉकडाऊनच्या बंधनामध्ये बांधल आहे आणि आजपर्यंत कधी न थांबणारे पाय मात्र आज पिंजऱ्यात अडकलेल्या पोपटासारखे झालेतं. सर्वांना बाहेर निघावं तर वाटते , पोपटासारखं उडावं वाटते पण सर्वानाचं माहीतंय की ' जान है तो जहान है '. पण काही का असेना सतत पैशाच्या मागे धावणारा माणूस म्हणजेच आम्ही-तुम्ही कधी परिवाराला वेळ न देऊ शकणारे या निमित्ताने तरी वेळ देत आहोत मग ते मजबूरीमध्ये का असेना !

सकारात्मक दृष्टीकोन हा आपल्याला कोणी देत नाही तो स्वतःमध्येच निर्माण करावा. असं म्हणतात मरण जवळून पाहिल्यावर आपण जगायला शिकतो. मरण जवळ करण्यापेक्षा आपल्यातील वाईट विचारांना, त्रास देणाऱ्या वाईट लोकांना मनापासून श्रद्धांजली द्या आणि मोकळा श्वास घ्या. जगणं खूप सोपं आहे तो जगण्याचा आणि अनुभवण्याचा पुन्हा पुन्हा प्रयत्न केला तर कुठे बिघडत. आयुष्यात काही गोष्टीकडे दुर्लक्ष केले की सोप्या होतात गोष्टी. एखादी परिस्थिती आपल्याला संपविण्याआधी तिच्यावर स्वार होऊन लढायला शिकले पाहिजे. अजूनही संधी गेलेली नाहीये संधी च सोनं करा.

नद्यांचे पाणी आज ६० ते ७० टक्के शुद्ध होऊन पिण्यायोग्य झाले आहे, मोकळे रस्ते पाहून जनावरे-पक्षी मनसोक्त फिरतायेत , संपुष्टात जात असलेली प्रकृती आपलं खरं रूप दाखवतेय आणि यावर सरकारने कितीही पैसा खर्च केला असता तरी त्यात बदल करणे शक्य नव्हते पण दुष्ट कोरोनाने मात्र ते शक्य करून दाखवलं ..... माणूस दोन वेळच्या जेवणावर देखील जिवंत राहू शकतो आणि ज्या चैनीच्या वस्तू आहेत ज्या मानवाने मानवासाठीच बनवलेल्या आहेत जसे की बर्गर , पिझ्झा , चायनीज , गुटखा , दारू ,सिगारेट या गोष्टी जीवनावश्यक वस्तू नाहीचं म्हणून थोडावेळ शांत राहून आपल्या सामाजिक, कौटुंबिक व वैयक्तिक गरजांसाठी प्रार्थना करू या.

आपल्या देशातील पुढाऱ्यांनी भ्रष्टाचारापासून दूर राहावे आणि प्रामाणिकपणे देशाची सेवा करावी. आज आपल्या देशात धर्माच्या नावाने कल्लोळ माजला आहे. सत्तेच्या नावाने हुकूमशाहीला जन्म घालण्याचा प्रयत्न चालू आहे. अशा ह्या घटनांना काढून लावून, समता व बंधुता या मूल्यांना प्राधान्य दिले जावे व त्याद्वारे देशाची सामाजिक, शैक्षणिक व आर्थिक पातळीवर प्रगती व्हावी म्हणून आपण प्रार्थना करू या.

**संकेत नारायण शिंदे, शिशुविहार बालक मंदिर इंग्रजी व मराठी०**



# कोरोना काळातील ऑनलाईन शिक्षण

*कोरोना काळातील ऑनलाईन शिक्षण*

आपल्या सर्वांवर अचानक आलेल्या या कोरोनारुपी संकटाने आपल्याला खूप गोष्टी शिकवल्या. काही गोष्टींकडे आपण सकारात्मक दृष्टीने बघायला शिकलो. एक शिक्षक म्हणून माझे विद्यार्थी, माझी शाळा आणि अध्ययन अध्यापन प्रक्रिया हे माझ्यासाठी सर्वात महत्वाचे आहे.या गोष्टींवर कोरोनाचा खूप प्रभाव पडला हे आपल्याला माहीतच आहे

त्यातूनच ऑनलाइन शिक्षणाची संकल्पना अधिक पुढे आली .आजच्या परिस्थितीत ऑनलाईन शिक्षण घेण्याकडे जास्त कल दिसतो आहे . पण आपल्या भारत देशात ऑनलाईन शिक्षण हे आज प्राथमिक अवस्थेत आहे. लॉकडाऊनच्या काळात ऑनलाइन शिक्षणाकडे सकारात्मक दृष्टीने बघणाऱ्यांचा गट मोठा झाला आहे. आणि ते योग्यही आहे. सध्याचे युग इंटरनेटचे आहे. व्हाट्सअप, फेसबुक, इंस्टाग्राम प्रत्येक स्मार्टफोनमध्ये असते. मोबाईल स्मार्टफोनचा जर आपण अभ्यासपूर्ण वापर केला तर बरेच ऑनलाईन ज्ञान आपल्याला घरबसल्या मिळू शकते. यामध्ये आपण कुठेही असलात तरी आपल्या वेळेनुसार घरबसल्या आपल्याला कमी खर्चात हे शिक्षण घेता येते .कोर्सेस करता येतात . विशेष म्हणजे एखादी गोष्ट समजली नसेल तर ती पुन्हा बघण्यासाठी उपलब्ध साहित्य मिळते. त्यातून आपण व्यवस्थित शिकू शकतो. व्हिडीओ, थेट संभाषण, चर्चा, प्रश्नोत्तरे यांसारख्या गोष्टी आपण या शिक्षणातून साध्य करू शकतो .ऑनलाइन शिक्षण व्यवस्थेमुळे शिक्षणाचे सार्वत्रिकरण, ज्ञानाची देवाण - घेवाण होण्यास मदत होईल . वरील सर्व गोष्टींचा सद्यपरिस्थितीचा विचार करता, प्रत्यक्ष शिक्षणाबरोबरच आपण ऑनलाईन शिक्षण हेदेखील तितकेच प्रभावी करू शकतो. हे आपल्या लक्षात येईल .

**सौ रीमा विलास गांगुर्डे, शिशु विहार बालक मंदिर इ.१ली ते ४ थी मराठी माध्यम**



# कोरोना एक संकट

आज संपूर्ण जग कोरोना या आजाराने पूर्णतः भयभीत झाले आहे. सर्वत्र करोना या आजाराने जणू काही थैमानच घातले आहे. जगण्यासाठी सकाळपासून तर रात्री झोपेपर्यंत पळणारा माणूस घरी शांत बसला आहे. घरातच त्याने स्वतःला कोंडून घेतले आहे. धावपळीचे जीवन जगणारा माणूस, मला वेळच मिळत नाही म्हणणारा माणूस या रिकाम्या वेळेत करायचे तरी काय? या चिंतेत आहे

'कोरोना' हा शब्द उच्चारला की अंगावर काटा उभा राहतो.अगदी लहानग्यांपासून तर म्हाताऱ्यांपर्यंत सध्या उच्चारात असलेला हा शब्द म्हणजेच "कोरोना". आपणा सर्वांना एक प्रश्न सतावतो की हा कोरोना म्हणजे नेमके काय ? तो आला तरी कोठून?, आणि असे अनेक प्रकारचे प्रश्न मनात येत असतात. सध्या आपणास अनेक माध्यमातून माहिती समोर येते ती म्हणजे फक्त आणि फक्त कोरोना. तसेच मला सुद्धा असे अनेक प्रश्न नेहमी सतावत होते नेमका काय असेल बरं हा आजार ,कसा होत असेल इत्यादी. तर त्यावर मला अनेक उत्तरं मिळत गेली त्यातलीच काही सोशल मीडियाद्वारे तर काही समाजातून. अशा विविध माध्यमांद्वारे कोरोना ची संकल्पना लक्षात आली. बऱ्याचदा आपण अशा काही गोष्टींकडे दुर्लक्ष करत असतो,ज्या आपल्या रोजच्या घडामोडींमध्ये घडतांना दिसतात अथवा होत असतात. त्यातलाच अचानक उद्भवलेला हा विषाणू म्हणजे कोरोना. कोरोना हा विषाणू अतिशय सूक्ष्म असा आहे आणि त्यात एवढी ताकद आहे की आज जगभरात बंद चा नारा आहे . लॉकडाऊन घोषित करण्यात आले आहे. एका सूक्ष्म अशा विषाणूमुळे जागतिक महामारी घोषित झाली. आणि त्यात अनेक बदल झालेले दिसत आहेत तर या कोरोनाची सुरुवात झाली ती म्हणजे चीनमधील वूहान नावाच्या छोट्याशा शहरापासून. आणि आज तो सर्वत्र पसरला आहे. अगदी नवजात बाळापासून तर म्हाताऱ्या पर्यंत जगात जणूकाही थैमानच घातले आहे. सर्वत्र हाहाकार माजला आहे.अगदी लहान उद्योगधंदे,व्यवसाय, कंपन्या ,शाळा, न थांबणारी अर्थव्यवस्था सुद्धा विस्कळीत झाली आहे.

या कोरोनाच्या महामारीमुळे अनेक बदल झालेले दिसत आहेत. जसं की गरजू गरीब लोकांचे हाल झाले आहेत. सर्वत्र मजूर घरात बसून आहेत. जगण्यासाठीच्या गरजा अशा अनेक घडामोडी समोर येतांना दिसताहेत. सर्वत्र शांतता अगदी शुकशुकाट. सर्वच जनता पूर्णतः घरात बसून आहे. याचे काही पर्यावरणावर चांगलेही परिणाम झालेले दिसून येतात, तसेच वाईटही परिणाम बघायला मिळत आहेत.जसे की अर्थव्यवस्थेच्या बाबतीत आणि चांगले परिणाम म्हणजे आज माणूस घरात आहे. आणि नेहमी कोंडमारा होणारे पशुपक्षी, प्राणी हे मोकळा श्वास घेतांना दिसत आहेत. पर्यावरणातील हवा देखील अतिशय मोकळी स्वच्छ अशी आहे. कोणत्याही प्रकारचे प्रदूषण होत नाही. त्यामुळे त्याचा चांगला परिणाम पर्यावरणावर तसेच मनुष्य जीवनावर झालेला दिसून येत आहे. यात चांगल्या व वाईट अशा दोन्ही बाजू समोर येतांना दिसतात. पर्यावरणीय बदल, आर्थिक बदल, सामाजिक बदल ,शैक्षणिक बदल, आणि कौटुंबिक असे अनेक प्रकारचे बदल दिसून येत आहेत.



आपण म्हणतो की कोरोना हा जागतिक महामारी म्हणून घोषित केलेला आजार आहे. मुळात आपल्यासारख्या अशा कित्येक जनतेपर्यंत याची संकल्पना स्पष्ट झालेली दिसून येत नाही. हा विषय अतिशय गंभीर असा आहे.अशा अनेक एक प्रकारच्या घडामोडी होतांना दिसतात पण  त्यातही अत्यंत मोलाचा वाटा आहे तो म्हणजे, आरोग्य कर्मचारी जसं की डॉक्टर नर्सेस आणि अजून काही हेल्थ वर्कर्स त्याचप्रमाणे पोलीस कर्मचारी यांचाही. अगदी दिवसाची रात्र करून ते जनतेसाठी लढताहेत, अहोरात्र सेवा देत आहेत.आणि त्यात आपल्यासारख्यांचा सुद्धा वाटा आहे आपणही समाजाचे काहीतरी देणे लागतो. त्याच प्रमाणे सर्वत्र हॉस्पिटलमध्ये सेवा देणारे डॉक्टर, नर्सेस,सफाई कामगार, जेवण पुरवणारे, हे तर साक्षात मृत्यू सोबतच लढा देत आहे. त्यांचेही कुटुंब आहे त्यांनाही भावना आहेत आणि ते सुद्धा एक माणूसच आहेत. त्यांनाही कोरोनाची लागण होऊ शकते, परंतु ते आपले कर्तव्य मोठ्या निष्ठेने निभावत आहेत.

आपल्या सर्वांना एकच सहकार्य करायचे आहे ,ते म्हणजे घरातच थांबायचे आहे आपण आपल्या कुटुंबाचे ,गावाचे, देशाचे, जगाचे रक्षण फक्त आणि फक्त घरात राहूनच करू शकतो.. घरातच बसूया हे युद्ध लढूया, कोरोनाच्या संकटावर मात करू या !!!!!

**अपूर्वा शेवाळे, प्रथम वर्ष- भोंसला इन्स्टिट्यूट ऑफ  नर्सिंग**



# प्रिय कोरोना

प्रति,

कोरोना विषाणू
Cell apartment Alveoli floor, Lungs, Respiratory system.
दिनांक-२०/४/२०२०

नमस्कार ! खर तर पत्रात काय लिहावं कळतच नाहीये कारण पहिल्यांदाच जगाच्या इतिहासात असे घडले असावे. तू एक असा विषाणू ज्याने जगातल्या २१० देशांना हतबल केलंय. ज्या विषाणूमुळे आज जगात जवळ-जवळ सत्तावीस लाख तेहतीस हजार पाचशे तीन (२७,३३,५०३) व्यक्ती बाधित असून एक लाख एक्क्याण्णव हजार आठशे नव्याण्णव (१,९१,८९९) मृत्युमुखी पडलेले आहेत. आमच्या सर्वांसाठी तर महाभयंकर परिस्थिती !खर तर तू आता खूपच प्रसिध्द झालाय.तुझ नाव न्यूज चॅनलवरील वार्ताहर इतक्या वेळा घेतात की तुझे नाव आम्ही विसरूच शकत नाही.

मी घरी बसून जेव्हा माझ्या मैत्रिणींशी बोलत होते,तेव्हा तर त्या दुसऱ्याच आनंदात होत्या.आता तू म्हणशील सर्वजण चिंतेत आणि त्या आनंदात का होत्या? खर तर त्यांना ह्याचा आनंद झाला होता की पहिल्यांदाच परीक्षा रद्द करून त्यांना पुढच्या वर्गात पास केलय. तुझ्यावर सगळ्यांनीच खूप विनोद लिहिलेत.लाॅकडाऊनमध्ये सर्वजण घरीच आहेत पण वेळ जात नाही म्हणून कोणी पदार्थ बनवतंय, तर कोणी इतर गोष्टींमध्ये आपला वेळ घालावातंय.तुझ्यावर कोणी चित्र काढतंय तर कोणी गाणी म्हणतंय,तर काही जण व्हिडिओ बनवून जनजागृती करत आहेत. सगळ्यांना चर्चेसाठी नवीन विषय मिळालाय आणि तो म्हणजे तू.

अस म्हणतात की एका नाण्याच्या नेहमी दोन बाजू असतात.चांगली आणि वाईट.तसाच तू पण.ज्या धकाधकीच्या आयुष्यात सर्वजण जगत होते,ते आता स्वतःच्या कुटुंबाला वेळ देऊ शकतात.सगळयांना अस वाटायचं की जंक फूड शिवाय आपण जगूच शकत नाही,पण सगळे हाॅटेल बंद असूनही जग तसेच चालू आहे.सगळयांना असे वाटायचे की क्रिकेटर्स, सिनेमातले हिरो खरे हिरो आहेत पण आता कळले की ते फक्त आपली करमणूक करतात.

पण तुझ्यामुळे आज कित्येकजण बेरोजगार झाले आहेत. कितीतरी जणांना आपला जीव गमवावा लागला आहे. संपूर्ण जग बदललय, थांबलय. खर तर हे माहिती नाही की,तू अजून आमच्याबरोबर किती दिवस राहशील पण आमच्या सर्वांमध्ये इतका विश्वास आहे की आम्ही एकत्र येऊन तुला नक्की हरवू.

प्रेषक,

**अनुष्का मोहोळे, नाशिक,महाराष्ट्र ,भारत**.



# मुलाखत

मुलाखत -आपल्या सुरक्षाकवचाची

कोरोना लॉकडाऊनच्या काळात आपल्या भारताचे खरे सैनिक म्हणजे डॉक्टर,पोलीस ,नर्स व सफाई कामगार यांच्याशी विद्या प्रबोधिनी मराठी माध्यमाच्या विद्यार्थ्यांनी ऑनलाइन संपर्क साधून त्यांची मुलाखत घेऊन त्यांचे विचार जाणून घेण्याचा प्रयत्न केला.

त्यापैकी श्रावणी मोरे या विद्यार्थिनीने **पोलिस निरीक्षक श्री. नारायण त्र्यंबक साळुंखे यांची मुलाखत** घेतली.-

नमस्कार सर, सध्या कोरोनाच्या काळात सर्वत्र धोकादायक परिस्थिती असतांना आपण जीवाची पर्वा न करता जनतेची सेवा करीत आहात. त्याबद्दल आम्ही आपले शतशः आभारी आहोत.

प्र.श्रावणी- सर, आपण जनतेची अगदी व्यवस्थित काळजी घेत आहात पण अशा परिस्थितीत तुम्ही स्वतःची काळजी कशी घेतात?

सर: मी बंदोबस्तासाठी जातांना मास्क लाऊनच जातो.खिशात सॅनिटायझरची बाटली ठेवतो .ड्युटी वरून परत आल्यावर अंघोळ करतो आणि माझे वापरलेले कपडे डेटॉल मध्ये भिजवून मग धुवायला टाकतो. आणि हे सगळं करूनच मी घरच्यांच्या संपर्कात येतो.

श्रावणी – या जैविक युध्दाबद्दल तुमचे मत काय?

सर- हे युध्द खरच भयानक आहे . या व्हायरसमुळे देशाचे आर्थिक नुकसान तर होतेच आहे . आपण सर्वांनी न डगमगता त्याला सामोरे गेले पाहिजे. सरकार जे निर्णय घेत आहे ते आपल्या चांगल्यासाठीच आहेत म्हणून सरकारने आखून दिलेल्या नियमांचे पालन केले पाहिजे. असे केल्यास या विषाणूला आपण नक्कीच मुळापासून नष्ट करू शकू.

श्रावणी – अश्या जैविक युद्धा बाबतचा तुमचा आणि सर्वांचाच पहिलाच अनुभव असेल , काय सांगाल या बद्दल.

सर- होय, माझा आणि सर्वांचाच हा पहिला अनुभव आहे मी आधी आर्मी मध्ये होतो आणि सेवा निवृत्त झाल्यावर मी पोलीस दलात काम करतोय . पण मला या आधी कधीच असा अनुभव आला नव्हता.

श्रावणी – सर, तुम्ही तुमचे काम अगदी जबाबदारीने पार पाडतात , पण जनतेचा तुम्हाला कसा प्रतिसाद मिळतो.

सर- सगळीच लोकं एकसारखी नसतात. वेगवेगळ्या प्रकारच्या लोकांना तोंड द्यावे लागते. काही लोकं एकदा समजावून सांगितलं की लगेच ऐकतात .काहींना अनेकदा सांगूनही ऐकायला आवडत नाही , आम्हाला उलट सुलट आणि खोटी उत्तरे देतात. अशा प्रसंगी कधीतरी मग बळाचा वापर करावा लागतो.

श्रावणी – तुम्ही जीवापाड मेहनत करतात पण सरकार कडून तुम्हाला योग्य मोबदला मिळतो का?

सर- हो, सरकार आमची पूर्णपणे काळजी घेते. आणि सध्याची परिस्थिती अशी आहे की मोबदल्याचा विचार न करता जबाबदारी निभावणे जास्त गरजेचे आहे.

श्रावणी – सर, तुमचे काम आवश्यक आहे, पण कधी असा विचार येतो का की मी हा पेशा स्वीकारला नसता तर बरं झालं असतं ?

सर-नाही, असं कधीच वाटलं नाही . कारण जे काम आपल्याला आवडतं तेच आपण स्विकारतो. कधीतरी थोडी काळजी वाटते की आपल्याला हा संसर्ग झाला तर घरच्यांना पण होईल पण खरंतर 'जनसेवा हीच ईश्वर सेवा ' त्यामुळे मला माझ्या पेशाचा नेहमी अभिमानच वाटतो.

श्रावणी – तुम्ही ही नोकरी करीत असतांना तुमच्या कुटुंबाकडे लक्ष द्यायला वेळ मिळतो का? की कुटुंबाकडे दुर्लक्ष होते?

सर- होय कधी कधी कुटुंबाकडे दुर्लक्ष होते. पण मी जेव्हा जेव्हा घरी असतो तेव्हा संपूर्ण वेळ कुटुंबाला देतो. त्यांच्या गरजा भागवण्याचा प्रयत्न करतो. तस माझ्या घरात माझा मुलगा आहे तो समजूतदार आहे तो बरीचशी कामं माझ्यापर्यंत येऊच देत नाही.



श्रावणी – सर आपल्या देशावर महामारीचे संकट ओढवले आहे अशा वेळी तुम्ही जनतेला काय संदेश द्याल ?

सर – मी हेच सांगेन की आपण जर सरकारच्या नियमांचे पालन केले तर आपण या संकटातून लवकरात लवकर मुक्त होऊ शकतो . स्वतःची काळजी घ्या आणि घरातच रहा . आवश्यक गोष्टींसाठीच बाहेर पडा , मास्क चा वापर करा, पोलिसांचे म्हणणे ऐकून घ्या आणि नियमांचे पालन करा.

श्रावणी – धन्यवाद सर , तुम्ही तुमचा अमूल्य वेळ मला दिला . खरचं तुम्हीच आमच्यासाठी "रियल हिरो" आहात. आम्हाला तुमच्यावर आणि तुमच्या कामावर प्रचंड अभिमान आहे. आम्ही देखील तुमच्याकडून कळत नकळत  देशसेवा , समर्पण या गोष्टी जाणून घेत आहोत. आणि असेच काहीसे कार्य करण्याचा आमचा देखील मानस असेल . पुनश्च आभार .तुमची काळजी घ्या , धन्यवाद !



# बहुरंगी सुट्टी

कोरोना विषाणूच्या थैमानामुळे मिळालेली ही अनपेक्षित सुट्टी ; पण या सुट्टीत मी कधी घेतले नव्हते इतके विविध विषयांमधले भन्नाट असे अनेक अनुभव घेतले .

खरं तर , या सगळयाची सुरुवात शाळा बंद होण्यापासून झाली . पाहिले शाळा , मग सगळीच सार्वजनिक ठिकाणं बंद झाली , लगेच २२ मार्चला जनता कर्फ्यु झाला , त्या दिवशी काय काय करायचं आहे ते आदल्या दिवशी ठरवलं होतं ; पण त्यावेळी कल्पना नव्हती की पुढे लॉकडाउन असेल . म्हणून २१ दिवसांचं लॉकडाउन जाहीर झाल्यावर मी सुन्नच झालो , कारण नेहमीच बाहेर वेगवेगळ्या कामांमध्ये गुंतून असणारा मी आणि आता दिवसभर घरीच ! मला ही कल्पनाच सहन झाली नाही . सुरुवातीचे काही दिवस अवघड गेले ; पण मी वेळ जाण्यासाठी माझं रुटीन ठरवलं . याच वेळी आमची ऑनलाइन शाळा सुध्दा सुरू झाली , त्यामुळे वेळ आनंदात जायला लागला .

संपूर्ण दिवसभर भरपूर व्यायाम, अभ्यास , वाचन करणं, छंद जोपासणं , यात माझा वेळ छान जाऊ लागला .त्यानंतर या सुट्टीची सुरूवात मी संध्या शिकण्यापासून केली , त्यामुळे माझा संध्याकाळचा वेळ जाऊ लागला . मुख्य म्हणजे या सुट्टीत मी स्वयंपाक करायला शिकलो. स्वयंपाकाचे अनुभव तर खूप भन्नाट आहेत. मी स्वयंपाकात कणिक मळणे, पोळया- भाज्या करायला शिकलो, त्यावेळी कणकेत पाणी किती घालावं , पोळी गोल लाटून कशी भाजावी, भाज्यांच्या फोडण्या कश्या कराव्यात हे शिकताना खूपच मजा आली .

याव्यतिरिक्त मी वेगवेगळे स्केचेस काढायला लागलो होतो; मग त्यात स्केच प्रमाणबद्ध काढण्यासाठी मापं कशी घ्यावीत हे शिकलो . याशिवाय आकाश दर्शनाचा आनंद घेतला , त्यात ताऱ्यांच निरीक्षण, उल्कावर्षाव मला बघता आला, त्यातून खगोलशास्त्राचा अभ्यास केला . त्याचबरोबर रोटरी क्लब तर्फे शालेय विद्यार्थ्यांसाठी चालवल्या जाणाऱ्या इंटरॅक्ट क्लबच्या कोरोना जनजागृती मोहिमेत सहभागी झालो. हे करतांना सुद्धा खूप मजा आली. आमची शाळा इंटरॅक्ट क्लबची सदस्य आहे आणि त्याचा मी व्हाईस प्रेसिडेंट असल्याने ते काम माझ्याकडे आलं, मग आम्ही सर्वांनी मिळून एक स्टे होम, स्टे सेफचं फोटो कोलाज बनवलं, त्यानंतर प्रत्येकानं एक एक वाक्य घेऊन त्याचा व्हिडीओ पाठवणं, मग त्याचं एकत्रीकरण करून पूर्ण व्हिडीओ बनवणं यात वेळ कसा गेला हे कळलंच नाही .

एकूण काय , तर माझ्यासाठी ही 'बहुरंगी सुट्टी' ठरली . पण आता यापुढे लॉकडाउन उठल्यावर घरी राहून वर्क फ्रॉम होमचीच सवय होऊन बाहेर पडण्याचा कंटाळा येतो की काय ? अशी भीती वाटते .

सोहम कुलकर्णी, विद्या प्रबोधिनी प्रशाला ,मराठी माध्यम



# माझ्या शाळेचा मज लळा....

कोरोना विषाणूचा वाढता प्रादुर्भाव लक्षात घेता साधारण मार्च महिन्याच्या दुसऱ्या आठवड्यापासून विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने शाळा बंद झाल्या.त्यानंतर लॉकडाऊन जाहीर झाल्यानंतर तर मुख्याध्यापक, शिक्षकवृंद यांचेही शाळेत येणे बंद झाले.

मात्र दरम्यानच्या काळात भोसला कुटुंबियातील कर्मचारी वर्ग मात्र नियमितपणे या रामभूमीतील विविध इमारतींची काळजी घेण्यासाठी आलटूनपालटून शाळेच्या परिसरात हजेरी लावत होता. सर्वजण घरामध्ये सुरक्षित असताना आमच्या रामभूमीतील वास्तू या कर्मचाऱ्यांनी सुरक्षित, स्वच्छ ठेवल्या.

भोसला चा संपूर्ण परिसर हा हिरव्या वनश्रीने नटलेला आहे. हे हिरवेपण या कर्मचारी वर्गाने अबाधित ठेवले. सर्वांनी कामे वाटून घेतली. नियमितपणे झाडांना पाणी घालणे ,झाडांची छाटणी करणे इत्यादी कामे यांच्याकडून होत राहिली. त्यामुळे आजही सर्व परिसर हिरवागार असल्याचे दिसून येते. यांच्यासोबतच भोसला परिवाराच्या सुरक्षा कर्मचाऱ्यांनी देखील आपले काम चोख बजावले. या काळात शालेय परिसरात लॉकडाऊन चे सर्व नियम पाळले जातील या दृष्टीने प्रयत्न केले. भोसला परिसर अतिशय विस्तीर्ण असल्याने अनेक प्रवेशद्वारे येथे आहेत. मात्र या सुरक्षा कर्मचाऱ्यांनी या प्रवेशद्वारांवर आपले काम व्यवस्थित पार पडले .

अशा आमच्या परिवारातल्या या सर्व कर्मचारी वर्गाचे खूप कौतुक आहे!!



# The Great Realisation of 2020

